कृषीवल

रायगड ॥ सोमवार, दिनांक २६ डिसेंबर २०२२

किंमत ४ ₹

चोहीकडे पर्यटकच

पान ३ वर

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशात मॉकड्रील

नवी दिल्ली : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने मंगळवारी (२७ डिसेंबर) देशभरातील सर्व आरोग्य सुविधांची पडताळणी करण्यासाठी मॉकड्रिल आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. कोरोना रुग्णांची वाढ झाली तर ऑक्सिजन सपोर्ट आणि आयसीयू बेड, व्हेंटिलेटर सपोर्ट असलेले बेड आणि इतर मानवी संसाधनांसोबत आपण किती तत्पर आहोत याची सुनिश्चितता या माध्यमातून केली जाणार आहे. आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी याबाबतची माहिती एका पत्रातून दिली आहे. यावेळी आरोग्य सुविधांचा आढावा घेतला जाणार आहे.

पनवेलमध्ये पाणीकपात

पाणीटंचाईची छाया सहा महिने लागू राहणार

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल शहरात आता आठवड्यातून एकदा पाणीकपात केली जाणार आहे. मजिप्रा आणि एमआयडीसीकडून वारंवार शटडाऊन घेतला जात असल्यामुळे पनवेलकरांना अगोदरच पाणीटंचाई जाणवते आहे. त्यात आता पुढील सहा महिने ही पाणीकपात सुरू राहणार असल्याने नागरिकांना मनस्ताप होणार आहे. सत्ताधारी भाजपच्या ढिसाळ नियोजनाने शहरवासियांना आतापासूनच पाणीकपातीला तोंड द्यावे लागणार आहे.

पनवेल शहरात पूर्वीच्या नगरपालिका क्षेत्रात महापालिकेचे देहरंग धरण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ या तीन वेगवेगळ्या प्राधिकरणांकडून पाणीपुरवठा केला जातो. पनवेल शहराला दररोज ३० ते ३२ एमएलडी पाण्याची गरज आहे. महापालिकेला दररोज मजीप्राकडून १५ आणि एमआयडीसीकडून ५ एमएलडी पाणी विकत घ्यावे लागते. उर्वरित १० ते १२ एमएलडी पाणी महापालिकेच्या मालकीच्या देहरंग धरणातून घेतले जाते. दर महिन्याला ५० लाखांपेक्षा जास्त रुपयांचे पाणी विकत घेणाऱ्या प्रशासनाला उन्हाळ्यापर्यंत पाणी पुरविण्याची कसरत करावी लागते. मागील काही वर्षांपासून पनवेल महापालिका पाण्याचे नियोजन करण्यासाठी १५ जूनपर्यंत म्हणजेच पावसाळा सुरू होईपर्यंत पाणीकपात करतात. मात्र दरवर्षी जानेवारी महिन्यापासूनच केली जाणारी पाणीकपात यंदा डिसेंबरपासूनच करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. •> पान २ वर

सत्ताधारी भाजपचे अपयश

पाच वर्षापूर्वी पनवेल मनपाची सत्ता मिळविताना शहराला नियमित पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन भाजपने दिले होते. त्यावेळी राज्यात भाजपचीच सत्ता होती. तरीही पाच वर्षात पनवेलमध्ये ठोस पाणीपुरवठा योजना राबविण्यात पनवेल भाजपला यश आलेच नाही. उलट दरवर्षी देहरंग धरणातील गाळ काढून कशीबशी तहान भागविण्याचे काम सत्ताधाऱ्यांनी केले. आता तर पनवेल मनपाची मुदत संपुष्टात आली आहे. तेथे सध्या प्रशासकीय राजवट आहे. त्यामुळे पनवेलचा पाणीप्रश्न सध्या तरी सुटणे अशक्य आहे. निवडणुका झाल्यावरच याबाबत ठोस निर्णय अपेक्षित आहे. तोपर्यंत पनवेलच्या सर्वसामान्य जनतेला पाण्यासाठी झगडावे लागणार हे नक्की.

कारगावातील अल्पवयीन मुलीचा

अतिप्रसंगानंतर खूनच

आरोपी अटकेत, पोलिसांचे मोठे यश

। खोपोली । वार्ताहर ।

कारगाव, ता.खालापूर सहा वर्षीय मुलीवर अतिप्रसंग करुन तिचा खून करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. यासाठी २० अधिकारी आणि २०० पोलीस अथक शोध घेत होते. आरोपीला पोलीस कोठडी देण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घर्गे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. अजय विजय चव्हाण, रा. कारगाव, ता. खालापूर असे आरोपीचे नाव आहे.

कारगावच्या जंगल परिसरात एका आठ वर्षीय बालिकेचा मृतदेह आढळून आला होता. प्राथमिक तपासात वन्यपशुने हल्ला करुन तिला ठार मारण्याची शक्यता वर्तविली जात होती. कारगांव गावाच्या मागील मैदानावर कोयना पुनर्वसन क्रिकेट सामने शुक्रवार ते रविवारी पर्यंत सुरू होते. याठिकाणी या मुलीच्या वडिलांचा वडापाव विक्रीचा व्यवसाय आहे. दुपारी वडिलांना पिण्याच्या पाण्याची बाटली आणि काही सामान घेऊन क्रिकेट सामने ठिकाणी गेली होती. •> पान २ वर

असा केला तपास

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश कदम व त्यांच्या पथकाने यातील या मुलीस जंगलाच्या दिशेने जाताना पाहणाऱ्या शेवटच्या इसमाकडे पुन्हा चौकशी केली. त्यावेळी चौकशी दरम्यान तो घाबरलेला व प्रत्येक चौकशीचे वेळी वेगवेगळी माहिती देऊ लागल्याने पोलिसांचा त्याच्यावर संशय बळावला. संशयित आरोपी प्रत्येक वेळी वेगवेगळी उत्तरे देत होता. त्यामुळे सखोल पद्धतीने तपास केला असता आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडे गुन्हा करण्याचा उद्देशाबाबत तपास केला असता मयत मुलगी ही त्याच्या समोरून एकटी जंगल भागाकडे गेल्याने त्या परिस्थितीचा फायदा उचलण्याच्या हेतुने त्याने तिचा पाठलाग केला. घटनास्थळी बळजबरीने नेऊन तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर ती घरी नाव सांगेल या भितीने तीचा गळा दाबून व त्यानंतर तिच्या डोक्यात दगड घालून ठार मारून खून केला आहे, अशी कबुली दिली. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक बाळा कुंभार व सहकारी तपास पथक हे करीत आहेत.

■ तपास कार्यात सहभागी झालेले पोलीस पथक.

म ह त्त्वा चे

उत्तर भारतात थंडीचा कडाका

नवी दिल्ली : सातत्यानं बदल होत आहे. हळूहळू राज्यात थंडीत वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मुंबईतही तापमानाचा पारा चांगलाच घसरला आहे. मुंबईत यंदाच्या हिवाळ्यातील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे. मुंबईत किमान तापमान १५ अंश सेल्सिअसवर गेलं आहे. त्यामुळं हुडहुडी वाढली आहे. तर कमाल तापमान देखील ३० अंश सेल्सिअसवर गेलं आहे. उत्तर भारतात थंडीचा कडाका चांगलाच वाढला आहे. दिल्लीतही थंडीत वाढ झाल्यानं हुडहुडी वाढली आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील तीन दिवस उत्तर भारतात थंडीचा जोर कायम राहणार आहे. तसेच धुके पडण्याची शक्यता देखील हवामान विभागाने वर्तवली आहे.

पॅराग्लायडर कोसळले

सातारा : हिमाचल प्रदेशातील कुल्लू येथे पॅराग्लायडिंग करताना साताऱ्यातील एका पर्यटकाचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी घडली. या घटनेतील मृताचे नाव सूरज संजय शाह (३०) असून कुल्लू जिल्ह्यातील डोभी गावाजवळ पॅराग्लायडिंग करताना हा प्रकार घडला. शहा यांच्या एका मित्राने याबाबत तक्रार दाखल केली. त्यानुसार, त्यांची एक महिला मैत्रिण शाह यांच्या आधी पॅराग्लायडिंग राईडवर गेली आणि सुरक्षितपणे जमिनीवर आली. पुढे, शाह यांना राईडवर नेण्यात आले आणि टेकऑफ केल्यानंतर लगेचच ते सुमारे ३००-४०० फूट उंचीवरून जमिनीवर पडले. पोलिसांनी सांगितले की, ते उड्डाण दरम्यान हार्नेसचा सुरक्षा बेल्ट कसा उघडला याचा तपास करत आहेत. पोलिसांनी पायलट विमल देव यांना अटक केली आहे आणि त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

महाडमध्ये मनुस्मृती दहन स्मृतिदिन

। महाड । प्रतिनिधी ।

महाड या ऐतिहासिक भूमीमध्ये आज ९५ मनुस्मृती दहन स्मृतिदिन साजरा करण्यात आला. २७ डिसेंबर १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती दहन करून भारतीय महिलांना स्वातंत्र्य मिळवून दिले. स्मृतीदिनाबरोबर मानव मुक्तीदिन व स्त्रीमुक्ती दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन सभेला बौद्धजन पंचायत समितीचे सभापती आनंदराज आंबेडकर उपस्थित होते. डॉ. बाबासाहेबांची शिकवण आचरणात आणून सन्मानाने जगा लाचारी पत्करू नका असे ते म्हणाले.

यानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बौद्धजन पंचायत समितीतर्फे क्रांतीभूमी मैदानामध्ये अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर विकास वंचित दलित राष्ट्रीय महिला मंडळ यांच्यातर्फे २५ डिसेंबर भारतीय महिला दिन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेच्या मुख्य संयोजिका डॉ. प्रमिला लीना संपत, पुष्पा गेडाम, पंचशीला चाळके यांच्यासह राज्यातून आलेल्या असेच महिला परिषदेमध्ये सहभागी झाल्या होत्या.

महाड शहरातील क्रांती भूमी येथील प्रांगणामध्ये बौद्धजन पंचायत समितीचे सभापती आनंदराज आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी डॉ. बाबासाहेबांनी समाजामध्ये वावरताना स्वाभिमानाने वागण्याची शिकवण दिली, •> पान २ वर

नाना पाटील हायस्कूलचे

दोन छात्र दिल्लीतील परेडमध्ये

। वाघ्रण । वार्ताहर ।

प्रजासत्ताक दिनी (२६ जानेवारी) दिल्लीत राजपथावर होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात को.ए.सो. ना.ना. पाटील हायस्कूलमधील सार्ज. जय महेश पाटील व कॅडेट. गौरव दत्तेश डिंगणकर या दोन कॅडेटची ची निवड झालेली आहे.

या कॅडेटने एक भारत श्रेष्ठ भारत (औरंगाबाद) येथे झालेल्या देशपातळीवरील कॅम्प मध्ये कल्चरल ॲक्टिव्हिटीमध्ये सुवर्णपदक मिळविलेले होते. त्यानंतर त्यांना पुणे येथे होणाऱ्या आरडीसी कॅम्प सिलेक्शनसाठी बोलविण्यात आले. त्यामध्ये सर्व महाराष्ट्रातून एकूण ११६ कॅडेटची निवड केली. त्यामध्ये ज्युनिअर डिव्हीजनच्या ३५ कॅडेटची निवड झाली, त्यामध्ये रायगड मधील या दोन कॅडेटचा समावेश झाला आहे.

या छात्रांना शाळेचे एनसीसी अधिकारी समाधान भंडारे यांनी मार्गदर्शन करून सर्व तयारी करून घेतली. तसेच सिक्स महाराष्ट्र बटालियनचे सीओ कर्नल मनिष अवस्थी सर्व पीआय स्टाफ यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. •> पान २ वर

लहान मुलांचे कचऱ्यावरच अंत्यसंस्कार

कळंबुसरेमधील विदारक घटना

। उरण । वार्ताहर ।

कळंबुसरे गावातील लहान मुलाच्या दफनभूमीवर रहिवाशांकडून मोठ्या प्रमाणात कचरा टाकण्यात येत आहे. अशा कचऱ्यावरच मयत झालेल्या एका लहान मुलांवर अंत्यसंस्कार करण्याची वेळ कळंबुसरे गावातील मयत मुलांच्या कुटुंबावर आल्याने संतापाची भावना निर्माण झाली आहे.

स्थानिक ग्रामपंचायत असो किंवा नगरपालिका यांनी आपापल्या परिसरातील मयत इसमांचे अंत्यसंस्कार हे सुसज्ज, चांगल्या जागेवर व्हावेत यासाठी हक्काची जागा म्हणून मुक्तीधाम (स्मशानभूमी), लहान मुलाच्या अंत्यसंस्कारासाठी दफनभूमीची जागा उपलब्ध करून दिली आहे. उरण तालुक्यातील कळंबुसरे गावातील लहान मुलाच्या अंत्यसंस्कारासाठी ही शासन, स्थानिक ग्रामपंचायतीने दफन भूमीची जागा ही गावाजवळ नियोजित केली आहे.

परंतु कळंबुसरे गावातील रहिवाशांसाठी हक्काचे डम्पिंग ग्राउंड नसल्याने घरातील केरकचरा हा गावा जवळील लहान मुलांच्या दफनभूमीच्या जागेवर टाकला जात आहे. त्यामुळे सदर दफनभूमीच्या जागेवर मोठ्या प्रमाणात केरकचरा विखुरलेल्या अवस्थेत दिसून येत आहे. एकंदरीत सदर जागा ही लहान मुलाची दफनभूमी की कचऱ्याचे डम्पिंग ग्राउंड असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यातच नुकताच मयत झालेल्या कळंबुसरे गावातील लहान मुलांवर अंत्यसंस्कार हे विखुरलेल्या कचऱ्यावरच करण्याची नामुष्की कुटुंबावर ओढावली.

■ अलिबाग बायपास रोड येथे असणाऱ्या चर्चमध्ये रविवारी नाताळनिमित्त सामुहिक प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले होते.

'अजित पवारांनी शिंदे गटात यावे'

। सिंधुदूर्ग । प्रतिनिधी ।

अजित पवार आमच्यासोबत आले तर आनंदच होईल. राष्ट्रवादीत अजित पवार यांची घुसमट होतेय हे सर्वांना माहिती आहे. उमदा नेते आमच्यासोबत आले आनंदच होईल, असे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले. सिंधुदूर्ग येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, राजकारणात एकमेकांची मैत्री असते. एकमेकांप्रती आदर असतो. अजित दादा यांच्याबद्दल आम्हाला सगळ्यांना आदर आहे. अजित दादा आपल्या सगळ्यांसोबत आले तर आनंदच होईल, असे केसरकर यांनी सांगितले आहे.

कोकणचा शिक्षण दर्जा देशात अव्वल

आ. बाळाराम पाटील यांचा विश्वास

। ओरोस । प्रतिनिधी ।

कोकणातील शिक्षणाचा दर्जा देशात अव्वल असेल,असा विश्वास कोकण शिक्षक मतदार संघाचे आ. बाळाराम पाटील यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य पुरोगामी शिक्षक संघटना आयोजित कोकण रत्न पुरस्कार सोहळा २०२२ रविवारी शरद कृषी भवन, ओरोस येथे संपन्न झाला. कोकण शिक्षक मतदार संघाचे आ.बाळाराम पाटील यांच्या माध्यमातून या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. •> पान २ वर

नाताळ विकेन्ड जोरात

मंदिरे, चर्चमध्ये भाविकांची गर्दी; व्यवसाय तेजीत

। पाली । प्रतिनिधी ।

विकेन्डला धरुन आलेला नाताळचा आनंद साजरा करण्यासाठी रायगडच्या सर्वच पर्यटनस्थळांवर रविवारी पर्यटकांची तुफान गर्दी दिसून आली. तसेच पाली, महड, साळाव, नांदगाव येथील मंदिरेअलिबाग, पेण, पनवेल, खोपोली, कोर्लई येथील चर्चेमध्येही भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. पर्यटकांच्या वाढत्या संख्येने छोटे, मोठे व्यावसायिक मात्र भलतेच तेजीत दिसून आले.

गेल्या दोन दिवसांपासून हवेतही कमालीचा गारवा निर्माण झाला आहे. त्यामुळे गुलाबी थंडीचा आनंद लुटण्याबरोबरच राहण्या-खाण्याचे दरात देखील मागील महिन्याच्या तुलनेत १० ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. सर्व ठिकाणी पर्यटकांची गर्दी आहे. यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेले हॉटेल व्यावसायिक, खानावळी, छोटे-मोठे दुकानदार, वाहतूकदार, राईड्सवाले यांची सध्या चलती आहे. पर्यटकांच्या वाहनांमुळे मुंबई-गोवा महामार्ग, पाली खोपोली राज्य महामार्ग, मुंबई पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई बैंगलोर महामार्ग आदी मार्गांवर गर्दी होत आहे. तर काही ठिकाणी वाहतूक कोंडी देखील पहायला मिळत आहे.

> नाताळ व नववर्षाच्या स्वागतासाठी देखील पर्यटकांची गर्दी प्रचंड वाढली आहे. अनेकांनी आगाऊ बुकिंग केले आहे. काही महिने मंदी होती मात्र आता खूप चांगला व्यवसाय होत आहे.
>
> – मनिष पाटील, चालक, माऊ रिसॉर्ट, दिवेआगर

महडचा वरदविनायक आणि सुधागड तालुक्यातील पालीचा बल्लाळेश्वर सध्या येथे •> पान २ वर

कर्जतमध्ये मालमत्ता करवाढ होणार नाही

। कर्जत । प्रतिनिधी।

कर्जतमध्ये कोणत्याही प्रकारचा मालमत्ता कर वाढविला जाणार नसल्याचे नगरपालिकेच्यावतीने जाहीर करण्यात आले आहे. याबाबत चर्चा करण्यासाठी पालिकेची विशेष सभा नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यामध्ये कर न वाढीचा ठराव करण्यात आला.

कर्जत नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११९ (१) (२) अन्वये कर्जत मधील मालमत्ता धारकांना नोटीस पाठविल्या आहेत, या नोटिशीमुळे कर्जतकरांच्या मनात टॅक्स वाढणार की काय अशा प्रकारची भीती निर्माण झाली आहे,कर्जतकरांनी आंदोलन उभे केले होते. त्यावर चर्चा करण्यासाठी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेस उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी वैभव गारवे, डॉ. ज्योती मेंगाळ, भारती पालकर, शरद लाड, विवेक दांडेकर, विशाखा जिनगरे, प्राची डेरवणकर, नितीन सावंत, बळवंत घुमरे, संचिता पाटील, पुष्पा दगडे,

पालिकेचा ठराव

सोमनाथ ठोंबरे, राहुल डाळींबकर, मधुरा चंदन, स्वामिनी मांजरे, वैशाली मोरे, उमेश गायकवाड, संकेत भासे, हेमंत ठाणगे उपस्थित होते.

ठरावात केलेल्या सुचने नुसार याकामी ई निविदा प्रक्रीया राबवून नागपूर येथील आर एस कन्स्ट्रक्शन कंपनीची ठेकेदार म्हणून नेमणूक करुन कामकाज हाती घेण्यात आले होते. नगरपरिषद क्षेत्रात पूर्वी १४ हजार मालमत्ता धारक होते, ठेकेदारा मार्फत करणेंत आलेल्या सर्वेक्षणा नुसार आता नगरपरिषद क्षेत्रात २० हजार २०६ मालमत्ता धारक असल्याची नोंद झाली आहे, त्यानंतर मालमत्ताल धारकाना नोटीस पाठविण्यांत आल्या होत्या. व त्यानुसार वरिष्ठ कार्यालया कडुन दिलेल्या कालावधीचे अनुषंगाने नागरीकांकडुन दि.२५ डिसेंबर २०२२ पर्यंत नगरपरिषद कार्यालयांत हरकती सुचना मागविण्यात येत आहेत.

त्यानुसार मालमत्ता धारकांना देणेत आलेल्या मुदतीत नगरपरिषद कार्यालयाकडे मोठ्या प्रमाणात हरकती सुचना प्राप्त झाल्या आहेत. यावरुन ठेकेदारामार्फत करणेत आलेल्या सर्वेक्षणामध्ये चुका असल्याचे निदर्शनास येत आहेत.याबाबत विविध संस्था, कर्जतकर आंदोलन, निदर्शन करताना दिसत आहेत.असे निदर्शनास आणण्यात आले.

वरील सर्व बाबींचा विचार करता कर्जत नगरपरिषदेच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या चर्चेत चतुर्थ वार्षिक कराचे पुर्नमुल्यांकन करण्याकरिता जिल्हाधिकारी व संबंधित वरिष्ठ कार्यालयाकडे पत्रव्यवहार करुन हरकती सुचना करिता मुदतवाढ घेणेंत यावी, ठेकेदाराने पुनर्मुल्याकनाचे कामकाजात झालेल्या चुका दुरुस्त करुन नागरीकांना पुन्हा नव्याने नोटीसा देणेंत याव्यात तसेच सदरच्या नोटीसा देण्यापूर्वी त्याची नियमातील तरतुदीनुसार नगरपरिषद अधिकारी यांचे मार्फत तपासणी करणेंत यावी. त्यानंतरच नोटीसा देणेंत याव्यात, अग्निशमन कर (०.५%) पुर्णपणे रद्द करण्यात यावा. त्या संबंधात वरीष्ठ कार्यालयाकडे पत्रव्यवहार करणेंत यावा, वृक्षकर हा पूर्वीपासून ०.५% या दराने लावणेंत येत आहे. त्याची आकारणी मागील दरानुसारच करणेंत यावी. त्यात कोणत्यारही प्रकारची वाढ नाही, शिक्षण कर नागरिकांना आकारण्यात आलेल्या शिक्षण कराची आकारणी ही शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार व दिलेल्या दरानुसार करणेंत येत आहे. सदरचा कर हा कर्जत नगरपरिषदेचा नसुन तो शासनाचा आहे. नगरपरिषदेमार्फत फक्त त्याची वसुली करणेंत येत आहे.

त्यानुसार वसुल झालेला शिक्षण कर वेळोवेळी शासनाकडे भरणा करणेंत येतो. शिक्षण कर व घसारा कराचे शासन नियमानुसार मुल्यांकर करुन नागरीकांना नोटीसा देणेंत याव्यात. नागरिकांना प्राप्त झालेल्या नोटीसा मध्ये आकारणी जादा वाटत असल्यास अगर मागील आकारणी पेक्षा मोठया प्रमाणात तफावत असल्यास त्या दुरुस्त करुन देणेंत येतील. कर्जत नगरपरिषदेने वरील पारित केलेल्या ठरावा नुसार कोणत्याही प्रकारची दर वाढ केलेली नाही. वेळोवेळी नागरीकांना करातून जास्तीत जास्त सवलती देणे करिता नगरपरिषद प्रयत्नशील आहे. असे नगराध्यक्षा जोशी यांनी जाहीर केले.

यावेळी झालेल्या चर्चेत नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, राहुल डाळींबकर, नितिन सावंत, शरद लाड, उमेश गायकवाड, सोमनाथ ठोंबरे, बळवंत घुमरे, संकेत भासे यांनी सहभाग घेतला.

महत्त्वाचे

गांजाचे सेवन दोघांविरुद्ध गुन्हा

। पनवेल । वार्ताहर ।

गांजा या अंमली पदार्थाचे उघड्यावर सेवन करणाऱ्या दोघांविरुद्ध पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. वावंजे येथील रिकाम्या मैदानात आरोपी मोहम्मद रशीद इस्माईल खान (वय ३६) हा व तालुक्यातील पाली येथील मोकळ्या मैदानात ज्ञानू रायसाहब सिंग (वय ३५) हे दोघे वेगवेगळ्या ठिकाणी गांजा हा अंमली पदार्थ सिगरेटच्या तंबाखूमध्ये मिसळून सेवन करीत असल्याचे आढळून आल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संजय गळवे व त्यांच्या पथकाने या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

क्लीनअप चेंढरे अभियानअंतर्गत सत्कार

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी।

रायगड जिल्हा परिषद अलिबाग व ग्रामपंचायत चेंढरे तालुका अलिबाग यांच्यामार्फत क्लीन अप चेंढरे अभियान अंतर्गत सोसायटी मध्ये शून्य कचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणाऱ्या अध्यक्ष व सचिवांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील व प्रियदर्शनी पाटील, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड, तसेच सरपंच स्वाती पाटील, माजी उपसरपंच यतीन घरत, उपसरपंच प्रणिता म्हात्रे व ग्रामपंचायत सदस्य रोहन पाटील, ममता मानकर,

अस्मिता म्हात्रे, अनिता शेंडे, स्मिता ढवळे, सकपाले, नेमाडे आदी उपस्थित होते.

प्रमुख मार्गदर्शक जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड यांनी शून्य कचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणाऱ्या व्यक्तीचा गौरव केला व स्वच्छतेत सातत्य राखणेसाठी विविध उपक्रम बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ईकोसत्व संस्थेचे प्रमुख विजय सकपाळ. संवाद तज्ञ सुरेश पाटील, रांजणकर, ग्रामसेवक नीलेश गावंड व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी टाकावूतून टिकाऊ वस्तू प्रदर्शनाचे उद्घाटन सरपंच पाटील व गायकवाड यांच्या हस्ते झाले. सूत्रसंचलन विजय सकपाळ तर प्रास्ताविक यतीन घरत यांनी केले.

कोलेटी ग्रामपंचायतीत शेकापच्या रीना जोशी विजयी

। पाली । वार्ताहर ।

कोलेटी प्रभाग क्र. २ दोन मधून येथील शेतकरी कामगार पक्षाचे कट्टर समर्थक जितेंद्र जोशी यांच्या पत्नी रीना जितेंद्र जोशी या भरघोस मतांनी निवडून आल्या.

रीना जोशी यांनी या अगोदर कोलेटी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची धुरा पारदर्शकपणे पार पाडली त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी ग्रामपंचायत हद्दीतील अनेक विकास कामे करून मतदारांची मने जिंकली होती त्याचाच फायदा त्यांना या निवडणुकीत झाला. जोशी यांना १५८ मते मिळाली तर त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवार विद्या ठाकूर यांना १०४ मते मिळाली. यात रीना जोशी या ५४ मताने विजयी झाल्या.

गावातील कार्यकर्ते वसंतशेठ भोईर काशिनाथ तांबोळी, कृष्णा डाकी आदिसह गावातील नागरिकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच रीना जोशी व त्याचे पती सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र जोशी यांनी सर्व मतदार बंधू आणि भगिनींचे आभार मानले.

अंजुमन महाविद्यालयात कर्मचारी कार्यशाळा

। मुरुड । वार्ताहर ।

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड-जंजिरा येथे कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी रविवारी विद्यार्थी प्रवेश व पात्रता यावर आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी उप कुलसचिव सुवर्णा महाडिक यांना प्राचारण करण्यात आले होते. यावेळी त्यांनी कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामांमध्ये विद्यार्थ्यांना मध्यबिंदू मानून त्यांच्या सर्व समस्यांना सोडविण्यासाठी उचित सहकार्य करणे अपेक्षित आहे. तसेच त्यांनी महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा

दिल्या. प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी उपस्थित प्रमुख पाहुण्याचे सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. महाविद्यालयाचे चेअरमन जैनुद्दीन कादिरी यांच्या नियोजनाखाली सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील कर्मचारी जुहेब मोदी, असिफ शेख, नवाब शेख, सुलतान मसालेवाले, नयुम शेख, संगीत धुमाळ, शेहजाद खान, रियाज काकर, शराफत शेख, सचिन उपाध्ये यांनी विशेष प्रयत्न केले.

पाच फुटी विषारी नागाला जीवदान

। मुरूड । वार्ताहर।

मुरूड शहरातील नाना खोत यांच्या नारळ, सुपारीच्या बागेत जाळ्यात अडकलेल्या पाच फुटी नागाला सर्पमित्र संदीप घरत यांनी सुखरूप सोडवून जीवदान दिले. खोत यांच्या पालोजी मोहल्ल्यातील नारळ सुपारीच्या बागेत कुंपण संरक्षण करण्यासाठी लावलेल्या जाळीत भक्ष्याच्या शोधात आलेला पाच फुटी विषारी नाग अडकून पडलेल्या अवस्थेत होता. सकाळी नेहमीप्रमाणे बाळ खोत बागेत कामानिमित्त गेले असता ही बाब त्यांच्या लक्षात आली. त्यावेळी या नागाला न मारता सर्प मित्र संदीप घरत याला बोलावून घेतले. संदीप घरत यांनी या नागाला सुखरूप सोडवून जीवदान दिले.

दिविलच्या निवडून आलेल्या उमेदवारांचा घोळ

जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल

। पोलादपूर । प्रतिनिधी।

दिविल, ता.पोलादपूर येथील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत वोटींग मशीनद्वारे झालेल्या मतमोजणीनंतर विजयी झालेल्या उमेदवारांची मते बदलली आणि दुसऱ्याच उमेदवारांना मते वाढवून निवडणूक यंत्रणेकडून विजयी घोषित करण्यात आल्याचे उघड झाले आहे. हे सध्या कागदोपत्री विजयी झालेले दोन्ही उमेदवार भारतीय जनता पक्षाचे असल्याचे तालुक्यात सांगितले जात आहे.

दिविल ग्रामपंचायतीच्या प्रभाग एकमधील दोन उमेदवारांच्या विजयी घोषित करण्यासंदर्भात हा घोळ झाला आहे. तहसिल कार्यालयाच्या या घोळामुळे विजयी उमेदवार कोण, हा विषय गंभीर चर्चेचा झाला आहे. पोलादपूर पोलिसांच्या गुप्तवार्ता विभागाच्या अहवालानुसार दिविलचे विजयी उमेदवार आणि निवडणूक विभागाच्या कागदपत्रांनुसार विजयी उमेदवार यांच्यामधील तफावतीमुळे जिंकले कोण? हे फक्त निवडणूक विभागाच्या कागदपत्रांनुसार ठरणार आहे.

निवडणूक विभागाच्या दिविल ग्रामपंचायतीच्या निकालाच्या जोडपत्र २१ नुसार सर्वसाधारण स्त्री आरक्षणाच्या तीन महिला उमेदवारांपैकी क्रमांक दोनच्या सुवर्णा भाऊ भिलारे यांना एकूण मते ३४४ पैकी १७१ मते प्राप्त झाल्याने त्या विजयी झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तर क्रमांक एकच्या उमेदवार रूपाली तुषार पवार यांना २५ मते तर क्रमांक ३ च्या मनिषा निलेश शिंदे १४६ आणि नोटा मते २ अशी आकडेवारी दिसून येत आहे. याच प्रभाग १ मधील अनुसुचित जाती आरक्षणासाठीच्या सदस्यासाठी झालेल्या निवडणुकीतील क्रमांक १ चे उमेदवार जंगम मंगेश देवलिंग यांना एकूण मते ३४४ पैकी १८९ मिळाल्याचे जाहिर करून विजयी घोषित करण्यात आले आहे. याच प्रभागातील क्रमांक २ चे उमेदवार मोरे प्रमोद चंद्रकांत यांना ०९ आणि क्रमांक ३चे उमेदवार सविता सदाशिव सोनावणे यांना १४५ तसेच नोटा मते ०१ अशी असल्याचे दिविल ग्रामपंचायतीच्या निकालाच्या जोडपत्र २१ नुसार निवडणूक निकाल जाहीर करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती घेतली असता पंचायत समितीच्या कृषी विभागाचे अधिकारी वसावे यांनी हे काम केले असून पोलादपूर तहसिल कार्यालयातील निवडणूक शाखेने या निकालाकामी अक्षम्य दिरंगाई करीत कोण विजयी कोण पराभूत हे स्पष्ट होण्यास अडथळा निर्माण केला आहे.

अनंत पाटील यांचे निधन

रसायनी : न्यू महाराष्ट्र राज्य गावकामगार पोलीस पाटील संघटनेचे कार्याध्यक्ष अनंत पाटील यांचे नुकतेच निधन झाले. हे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष होते.

शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी युवक संघटनेचे रायगड

जिल्हा अध्यक्ष देवेंद्र पाटील यांचे ते वडील होते. त्यांच्या निधनाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पाटील परिवाराचे सांत्वन केले. पाटील यांचे दशविधी कार्य मंगळवारी (२७ डिसेंबर) श्री क्षेत्र देवाची आळंदी येथे तर होमविधी दि.२८ डिसेंबर तर ३० डिसेंबर रोजी तेराव्याचे विधी आणि उत्तर कार्य देवळोली येथील निवासस्थानी होणार आहे.

प्रणाली पाटील,आदिती सगर यांचा सन्मान

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी।

अलिबागच्या सामाजिक कार्यकर्त्या डॉ. प्रणाली विनायक पाटील, (वाईल्ड लाईफ वेलफेअर वॉरीअर आदिती ज्ञानेश्वर सगर यांचा अँटी करप्शन फाऊंडेशन ऑफ इंडियाच्या रायगड टीमच्या वतीने, सर्टिफिकेट ऑफ अप्रेसिएशन या बहुमानाने प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी धनंजय म्हात्रे, रुपेश दांडेकर, योगेश घरत, श्रीकांत शिंदे, संदेश खोत, हर्षल कदम, मिलिंद मगर, नवनाथ वाघ तसेच इतर सहकारी उपस्थित होते. या उपक्रमाची संकल्पना व मार्गदर्शन धनंजय म्हात्रे यांनी केले.

नोकरीच्या आमिषाने दोघांची फसवणूक

। पनवेल । वार्ताहर।

तुम्हाला कार खरेदी करून देतो व ती कंपनीला सुद्धा भाड्याने लावून देतो असे सांगून एका भामट्याने दोघा जणांना १३ लाखांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे.

केशव घरत (रा.काळुंद्रे) यांना व त्यांच्या मित्राला आरोपी विशाल कलगुडे याने ह्युंदाई कंपनीच्या कार खरेदी देणार व त्या कार इंडियन ऑइल कंपनीमध्ये फिक्स लावतो त्याकरिता प्रत्येक कारसाठी दीड लाख रुपये प्रमाणे पैसे भरण्यास सांगितले. त्यानुसार प्रत्येक कारचे महिना ४५ हजार २०० रुपये मिळतील असे आमिष दाखवून त्यांच्याकडून तीन कार खरेदी करण्यासाठी साडे चार लाख रुपये व त्यांचा मित्र याच्याकडून सहा कार खरेदी करण्यासाठी आठ लाख चाळीस हजार रुपये रक्कम घेतली. त्यानंतर त्याने कार न दिल्याने त्याच्याकडे पैसे परत मागितले असता विशालने त्यांच्या सोबत झालेला करार रद्द करण्यासाठी त्यांच्याकडून १५ हजार ६०० रुपये घेऊन कार परत न देता तसेच एकूण १३ लाख ५ हजार ६०० रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त जागा भरण्याची मागणी

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी अंतर्गत असलेल्या उपकेंद्रांमध्ये अनेक वर्ष महत्त्वाच्या जागा रिक्त असून त्या अद्यापही भरल्या नसल्यामुळे अन्य कर्मचाऱ्यांवर अधिक कामाचा मोठा ताण पडत आहे. या आरोग्य केंद्राच्या अंतर्गत कुडली, सुतारवाडी, तळवळी, गारभट, संभे, धाटाव अशा ठिकाणी उपकेंद्र असून या केंद्रांची लोकसंख्या ६१,४८१ एवढी असून ५१ गावांचा समावेश आहे.

धाटाव, संभे, गारभट या उपकेंद्रात आरोग्य सेविका पद रिक्त आहे. त्याचप्रमाणे उपकेंद्र तळवली आणि संभे यांचे आरोग्य सेवक पद रिक्त आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी येथे हिवताप कार्यालयात आरोग्य सहाय्यक हे पद रिक्त आहे. या रिक्त असलेल्या पदांच्या जागा न भरल्यामुळे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामांचा मोठा ताण पडत आहे. वरील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र ही ग्रामीण भागात असून त्या ठिकाणी विविध ठिकाणाहून आलेल्या नागरिकांची गैरसोय होत असते. नागरिकांची गैरसोय दूर व्हावी तसेच कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवरील अधिक कामाचा ताण पडू नये म्हणून उपकेंद्रांमध्ये रिक्त असलेल्या जागा लवकरात लवकर भराव्यात अशी नागरिकांची मागणी आहे.

पान १ वरुन

पनवेलमध्ये पाणीकपात

यासंदर्भात पनवेल महापालिकेने जाहीर सूचना देऊन पनवेल शहरामध्ये जलकुंभनिहाय आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद करण्यात येणार आहे, असे नमूद करण्यात आले आहे. पनवेल शहरातील सर्व्हिस हौद, भाजी मार्केट, मार्केट यार्ड, पटेल मोहल्ला, ठाणा नाका उंच जलकुंभ, हरिओम नगर, बायपास आदी ठिकाणांहून वेगवगळ्या भागांत पाणीपुरवठा केला जातो. मजीप्रा आणि एमआयडीसीकडून पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या न्हावाशेवा पाणीपुरवठा टप्पा ३ योजनेची जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. दीड वर्षांपासून सुरू असलेल्या कामामुळे वारंवार इलेक्ट्रिक शटडाऊन आणि ब्रेकडाऊन घेतले जातात. त्यामुळे पाणीपुरवठ्यात अडथळे निर्माण होतात. सुमारे १८ एमएलडी पाण्यासाठी इतरांवर अवलंबून असलेल्या महापालिकेला अडथळे निर्माण होतात. त्यामुळे यंदाही पाणीकपात करण्याचा निर्णय महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने घेतला आहे. परंतु या निर्णयामुळे नोकरदार महिलावर्गांना नाहक त्रास होणार आहे तसेच अनेक सोसायट्यांमधील पाणी सोडण्याचे वेळापत्रक बदलणार आहे. यातूनच सोसायट्यांमध्ये वादाचे प्रसंग निर्माण होण्याची शक्यता आहे.

महाडमध्ये मनुस्मृती दहन स्मृतीदिन

आज समाजाची दिशाभूल करून आपला स्वतःचा स्वार्थ साधून घेणारे अनेक जण आहेत त्यांच्यापासून सावध राहण्याची आवाहन आनंदराज आंबेडकर यांनी केले.

या सभेला अशोक जाधव, दीपक साळवी, बाबू गायकवाड, सखाराम जाधव, चंद्रमणी तांबे, पवार, सुशीला जाधव, सुप्रिया शिर्के, मर्चंडे ताई, अनंत कांबळे, सुप्रिया साळवी, अपर्णा लोखंडे, गायकवाड, संघमित्रा गायकवाड, जितेश गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हजारो अनुयायी अभिवादन सभेला उपस्थित होते सकाळपासून चवदार तळे क्रांतीस्तंभ राष्ट्रीय स्मारक या परिसरामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थिती लक्षणीय होती. चवदार तळे येथील आंबेडकर यांच्या पुतळ्याला अनेक मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

दोन छात्र दिल्लीतील परेडमध्ये

या परेडमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थी प्रचंड मेहनत करतात. एनसीसी च्या विविध चाचण्यांतून विद्यार्थ्यांची आरडीसाठी निवड केली जाते. १ जानेवारी ते ३० जानेवारी या कालावधीत निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची दिल्लीत राहण्याची व्यवस्था केली जात असते. या कालावधीत या विद्यार्थ्यांचा सराव करून घेतला जातो. या दरम्यानचा संपूर्ण खर्च केंद्र सरकारतर्फे केला जातो.

या निवडीबद्दल शाळा समितीचे सभापती पंडित पाटील यांनी कॅडेट व मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन केले. मुख्याध्यापक के.के.फडतरे, सत्रप्रमुख शशी पाटील, पिळवणकर, खरसंबळे तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी कौतुक केले

नाताळ विकेन्ड जोरात

भाविकांची दर्शनासाठी रीघ लागलेली होती. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर पर्यटक मोठ्या संख्येने येत आहेत.

नाताळ सुट्यांमध्ये पर्यटकांच्या संख्येत खूप वाढ होत आहे. ३१ डिसेंबर पर्यंत गर्दी कायम राहील. पर्यटकांना सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा योग्य दरात देण्यासाठी येथील व्यावसायिक सज्ज झाले आहेत. व्यावसायिकांचा व्यवसाय चांगला होत आहे. शिवाय महसूल देखील वाढत आहे. कोरोनाचा नवीन व्हेरियंट आल्याने पर्यटकांनी सुरक्षित अंतर ठेवून मास्क वापरावे आणि ग्रामपंचायतीस सहकार्य करावे,असे आवाहन हरिहरेश्वरचे सरपंच अमित खोत यांनी केले आहे.

अतिप्रसंगानंतर खूनच

परंतु ती वडिलांकडे पोहचलीच नाही. सायंकाळी ५ वाजता वडील घरी पोहचल्यावर सर्वत्र शोधाशोध केल्यावर जंगलात आराध्याचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच खालापूर उपविभागीय पोलिस अधिकारी संजय शुक्ला, खालापूर पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, वनविभागाचे अधिकारी यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. यावेळी तिचा मृतदेह आढळून आला.

हत्येची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनीही तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी आराध्याचे तोंड फाटले होते. तिच्या हातापायावर प्राण्याच्या नखांच्या खुणा तसेच तिच्या नखांमध्ये प्राण्याचे केस आढळल्याने जंगलातील हिंसक प्राण्याने हल्ला केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. रात्री उशीरा खालापूर प्राथमिक रूग्णालयात मृतदेह आणल्यावर सकाळी पुढील तपासाच्या दृष्टिकोनातून जेजे रूग्णालयात हालविण्यात आहे. सोमवारी सकाळापासून क्राईम ब्रँचचे पोलीस अधिकारी, वनविभागाचे अधिकारी तपास करीत होते.

त्यानंतर तिचे शवविच्छेदन सर. जे. जे. रूग्णालय मुंबई येथे करण्यात आले तेव्हा तिचा गळा दाबून तिच्या डोक्यात हत्याराने जखम केल्याने मयत झाल्याचे सांगितल्याने अज्ञात आरोपी विरुद्ध खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळाची परिस्थिती पाहता या मुलीस कोणत्यातरी हिंस्र प्राण्याने हल्ला केल्याचे वाटत होते. परंतु कोणतेही पुरावे घटनास्थळी किंवा आजुबाजुचा परिसरात मिळून येत नव्हते, तसेच घटनास्थळ हे जंगलभागात असल्याने त्या ठिकाणी कोणतेही सीसीटीव्ही कॅमेरे, अथवा इतर माहिती उपलब्ध होत नव्हती. तसेच कारगाव गाव व घटनास्थळ हे अत्यंत जवळ असल्याने तांत्रिक बाबींची पडताळणी करणे देखील अत्यंत अवघड होते. तसेच त्या दिवशी गावामध्ये क्रिकटचे सामने आयोजित केल्यामुळे आजुबाजुच्या गावातील मोठ्या प्रमाणावर क्रिकेटचे संघ व प्रेक्षक गावामध्ये त्यामुळे त्या प्रत्येकाकडे चौकशी करणे अत्यंत जिकीरीचे झाले होते. त्यामुळे आरोपीचा शोध घेणे व गुन्ह्याची उकल करणे अत्यंत कठीण होते.

पोलीस अधीक्षक रायगड सामनाथ घर्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस संजय शुक्ला, किरण सूर्यवंशी, पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांचे नेतृत्वात पोलीस निरीक्षक खालापूर बाळा कुंभार, शिरीष पवार, अश्वनाथ खेडकर, विश्वजित काईगडे, तेंडुलकर, गणेश कराड, बालवडकर, अजित साबळे, तृप्ती बोराटे, प्रदीप आरोटे, सरला काळे, महेश कदम, निलेश सोनावणे, तुषार सुतार, नितीन शेडगे, हेमंत कोकाटे, सचिन व्हसकोटी, गणेश गिरी, शरद फरांदे, प्रतिक सावंत, सुधीर मोरे, राकेश म्हात्रे सायबर सेलकडील स्टाफ यांनी कसून रात्रंदिवस तपास केला. अपघातग्रस्त टीममचे गुरूनाथ साठेलकर यांच्या टीमने मोठी मदत केल्यामुळेच आरोपी अजय विजय चव्हाण यास अटक करण्यात यश आले आहे.

कोकणचा शिक्षण दर्जा देशात अव्वल

या पुरस्कार वितरण सोहळ्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संस्थाचालक मुख्याध्यापक व आदर्श शिक्षक यांचा गौरव करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विकास सावंत, शिवसेना नेते संदेश पारकर, शिवव्याख्याते प्रशांत देशमुख, मराठा महासंघाचे अध्यक्ष ॲड.सुहास सावंत, काका मांजरेकर,दिनेश म्हाडगुत यांच्यासह विविध मान्यवर संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आमदार बाळाराम पाटील यांनी मनोगतामध्ये शिक्षक बांधव यांच्याबद्दल ऋण व्यक्त केले. सिंधुदुर्ग जिल्ह्यांनी जे प्रेम केले त्याबद्दल त्यांनी सिंधुदुर्ग वासियांचे आभार मानले तसेच कोकणातील शिक्षणाचा दर्जा हा देशात अव्वल आणणार असे अभिवचन देखील दिले.

पर्यटकांची मांदियाळी

■ नाताळच्या सलग सुट्टीत मुरुड येथील जंजिरा किल्ला पाहण्यासाठी तोबा गर्दी. पर्यटकांनी सकाळपासून रांगा लावल्या.

॥ मुरुडकडे हजारो वाहने, रस्ते जॅम

॥ किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांच्या रांगा

। मुरुड जंजिरा । सुधीर नाझरे ।

नाताळ सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी मुरुडला हजारो पर्यटक दाखल झालेले आहेत. मुरुड, काशीद, मुरुड, नांदगाव व ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांनी मोठी गर्दी केली आहे. राजपुरी येथे जंजिरा किल्ल्याचे तिकीट काढण्यासाठी पर्यटकांची गर्दी झाली. राजपुरीकडे जाणारा रस्ता अरुंद असल्याने वाहतूक कोंडी झाली. ओहोटीमुळे समुद्राचे पाणी जेट्टीला लागत नसल्याने शेकडो पर्यटक किल्ला न पाहतच परतले. रविवारी सकाळी पर्यटकांची तुफान गर्दी जेट्टीवर झाली होती. त्यातच शाळांच्या सहलीही वाढल्या आहेत. दररोज १२ गाड्या येत असल्याने जंजिरा किल्ल्यात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी होती.

मुरुडला मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाले असून ते सर्वजण नाताळ सुट्टीचा आनंद घेत आहेत., पर्यटकांनी शनिवारी सायंकाळपासून गर्दी करण्यास सुरुवात केली होती. हळूहळू सर्व लॉजेस फुल्ल झाले. किनारी असणाऱ्या प्रत्येक स्टॉल्सवर गर्दी पहावयास मिळत आहे

रविवारी जंजिरा किल्ल्यावर औरंगाबाद, पुणे, कोल्हापूर, लातूर परभणी, मुंबई, कल्याण, डोंबवली विरार, दहिसर, ठाणे आदी भागातील पर्यटक मोठ्या संख्येने आले होते. त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनांची मोठी गर्दी दिसत असून काही काळ वाहतूक कोंडी सुद्धा झाली. परंतु पोलिसांनी आपली भूमिका चोख बजावत असल्याने वाहतुकीस रस्ता मिळत होता. समुद्र स्नान बोटिंग, उंट सवारी, बनाना रायडिंग आदींचा आनंद लुटताना पर्यटक दिसत होते.

व्यवसाय तेजीत

हॉटेल मधील चविष्ठ मासे खाण्यासाठी पर्यटकांनी मोठी गर्दी केल्याचे सुद्धा दिसून आले. पर्यटकांची संख्या वाढल्याने प्रत्येक घटकाला स्वयंरोजगार प्राप्त झाला होता. प्रत्येक तासाला वाहनांची वाढती संख्या व वाहतुकीसाठी रस्ता मोकळा करताना मोठी समस्या उद्‌भवत होती. पर्यटकांमुळे आज मुख्य बाजारपेठेत सुद्धा गर्दी दिसून आली विविध वस्तू खरेदीसाठी पर्यटक बाजारपेठेत सुद्धा आले होते.

पर्यटन महोत्सव नाही

मुरुड महिला मंचाने पर्यटकांसाठी फूड फेस्टिवलचे आयोजन केले. कोकणी व सर्व प्रकारचे खाद्य पदार्थ चवीने पर्यटकांनी घेतले. यावर्षी नगपालिका आयोजित पर्यटन महोत्सव नसल्याने पर्यटक नाराज झाले आहेत.

पर्यटकांना खुणावतोय अलेक्झांडर पॉईंट

। नेरळ । प्रतिनिधी ।

साधारणतः माथेरान बाजारापासून तीस मिनिटे चालत गेल्यास अॅलेक्झांडर पॉईंट येतो. हाच पॉईंट माथेरानमध्ये येणाऱ्या प्रत्येक पर्यटकांना खुणावतोय. माथेरान बाजारातून सरळ रस्त्याने गेल्यास एक चौक लागतो. डावीकडचा रस्ता अलेक्झांडर पॉईंटला जातो. उजवीकडे शालॉट तलावाकडे, सरळ गेल्यास चौक पॉईंट, वन ट्री हिल, ऑलम्पिया मैदानाकडे जातो. रस्त्याला मंद उतार असल्याने चालताना थकवा जाणवत नाही. गर्द



झाडी, डाव्या बाजूला उतरत जाणारी खोल दरी, अन् झाडांच्या गर्दीतून ही वाट जाते. माथेरानमधील रस्त्यांना नैसर्गिक चढ-उतार आहे.

या प्रेक्षणीय स्थळावरून कर्जत तालुका आणि लोणावळा परिसर त्यात येतो. त्यात पळसदरी तलाव, रामबाग पॉईंट, गारबट गाव, गारबट दरी, गारबट पॉईंट, उल्हास नदीचे खोरे, काठावरची गावे, भिवपूरी पॉवर हाऊसचे टॉवर्स येथून दिसतात. सूर्योदय पहाण्यास हे ठिकाण उत्तम आहे. खंडाळा डोंगर, सोंडाईत डोंगर येथून दिसतो. कर्जत-बुरुजवाडी पोखरवाडी असे येता येते - व नंतर अलेक्झांडरचा पायथा. पायथ्यावरून अलेक्झांडर पॉईंटला जाताना सगळे रस्ते, पायवाटा सारख्याच दिसत असल्याने, वाट चुकून खाटव या गावाकडे जाण्याचा धोका गिर्यारोहकाला असतो. त्यामुळे गिर्यारोहकाला सतर्क राहावे लागते. समोरच पळसाची झाडे असलेली पळसदरी आहे. कर्जत रेल्वे स्टेशनला पाणीपुरवठा करण्यासाठी पळसदरी हा तलाव रेल्वे खात्याने बांधला आहे. धरणाची लांबी कमी व पाण्याचा विस्तार व साठा भरपूर अशी धरणासाठी उत्कृष्ट जागा आहे. पळसदरी डोंगरातील धबधबे पावसाळ्यात प्रेक्षणीय आहेत.

डाव्या बाजूला डोंगरकड्यावर वसलेला माथेरान बाजार येथून दिसतो. गारबट पॉईंट ते अलेक्झांडर पॉईंट बिट्रीस क्लिफ दरी म्हणून ओळखली जाते.

मुरुडला पारा १५ अंश

। मुरूड । वार्ताहर ।

मुरूडमध्ये थंडीचा कडाका वाढला आहे. रविवारी या वर्षातील सर्वात जास्त थंडी पडल्याने पारा घसरुन १५ अंशावर स्थिरावला होता. या वाढलेल्या थंडीमुळे ग्रामस्थांनी या वर्षातील पहिल्या शेकोटीचा आधार घेतला असल्याचे चित्र पाहायला मिळाले आहे. पारा घसरल्याने येथील वातावरण आल्हाददायक आहे.

कर्जत-खालापूर बाजार समित्यांची निवडणूक स्थगित

ग्रा.पं.सदस्य होणार नवे मतदार

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत आणि खालापूर तालुक्यातील बाजार समितीच्या प्रलंबित असलेल्या निवडणुका घेण्यासाठी मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार होती. मात्र मतदार याद्या ६ डिसेंबर रोजी प्रसिद्ध झाल्या नसल्याने आता निवडणूक कार्यक्रम एक महिना स्थगित करण्यात आला आहे. दरम्यान, ६ जानेवारी रोजी नवीन कार्यक्रम जाहीर होणार असून त्यानंतर तालुक्यातील बाजार समित्यांच्या निवडणूक कार्यक्रम जाहीर होऊ शकतो.

कर्जत- खालापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा निवडणूक कार्यक्रम राज्य सहकार प्राधिकरणाच्या निर्देशानुसार जाहीर करण्यात आला होता. मात्र अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याचा कालावधी हा ७ डिसेंबर २०२२ ठेवण्यात आला असताना यादीच्या निवडणूक प्रक्रिया सुरु होऊनही जुन्याच ग्रामपंचायत सदस्यांची यादी अंतिम करण्यात आली होती. त्यामुळे नव्याने ग्रामपंचायत निवडणुका झाल्यानंतर नवीन ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आलेल्या सदस्यांचा समावेश या यादीत करण्यात यावा व त्यानंतर कर्जत खालापूरमधील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका घेण्यात यावी अशी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली होती. त्यासंदर्भात २२ डिसेंबर रोजी झालेल्या सुनावणीत ६ जानेवारीपर्यंत कर्जत खालापूर कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक लांबणीवर करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिल्याने या मागणीला मोठे यश आले आहे.

बाजार समितीच्या निवडणुकी संदर्भात नवीन ग्रामपंचायत सदस्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्या संदर्भात करण्यात आलेली मागणी यशस्वी ठरल्यानंतर तालुक्यातील नव्याने झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीमधील ग्रामपंचायत सदस्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळणार आहे. त्यामुळे बाजार समित्यांच्या निवडणुका लांबणीवर घेण्यात आलेल्या आहेत.

बांधकाम साईटवर मृतदेह

। पनवेल । वार्ताहर ।

शहरातील एका बांधकाम साईटवर एका इसमाचा मृतदेह आढळून आल्याने त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. सत्यम शिवम सुंदरम या इमारतीच्या बांधकाम साईटवर सारस्वत बँकेच्या बाजूला एका ३५ ते ४० वयोगटातील इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याचे नाव संजू असे आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्र ०२२-२७४५२३३३ संपर्क साधावा.

पनवेलमध्ये एकाच उद्यानाचे तीनवेळा उद्‌घाटन

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

खाजगी कंपनीच्या सीआरएस फंडातून विकसित करण्यात आलेल्या उद्यानाचे तीन वेळा लोकार्पण करण्याचा प्रताप कळंबोली वसाहतीत करण्यात आला आहे.

मनसे पदाधिकाऱ्याने प्रशासनाला आव्हान दिल्यानंतर उद्यानाचे बंद असलेले दरवाजे अनपौचारिक सामान्यासाठी खुले करण्यात आले होते. मात्र त्यानंतर श्रेयवाद घेण्यासाठी बाळासाहेबांची शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे त्याच उद्यानाचा उदघाटन सोहळा साजरा करण्यात आल्याने हा विषय चर्चेचा ठरला आहे.

कळंबोली वसाहतीत उद्यानाचे

आयजीपीएल कंपनीच्या सीआरएस फंडातून जवळपास अडीच कोटी रुपये खर्च करून सुशोभीकरण करण्यात आलेले हे उद्यान सर्व सामान्यांन साठी खुले झाले नसल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी नितीन काळे यांनी हे उद्यान सर्व सामान्यांना खुले करून द्यावे असे, पत्र पालिका प्रशासनाला पाठवले होते. काळे यांनी दिलेल्या पत्रात उद्यान खुले न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा देखील देण्यात आला होता. मात्र काळे यांच्या अगोदर बाळासाहेबांची शिवसेना नेते रामदास शेवाळे आणि राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक सतीश पाटील यांनी देखील उद्यान खुले करण्यासाठी पालिका प्रशासनासोबत पत्र व्यवहार केला असल्याने सर्व सामन्यांसाठी खुले करण्यात आलेल्या या उदयनाचा लोकार्पण सोहळा तिन्ही पक्षाच्या नेत्यांनी आपआपल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पार पाडला आहे.

म ह त्त्वा चे

इमेज कॅलेंडरचे उद्या प्रकाशन

अलिबाग : अलिबाग येथील छायाचित्रकार जितू शिगवण, रमेश कांबळे, समीर मालोदे यांच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या इमेज कॅलेंडर्सचे प्रकाशन मंगळवारी (२७ डिसेंबर) सकाळी १०.३० वाजता करण्यात येणार आहे. आदर्श नागरी पतसंस्था मुख्य कार्यालय आदर्श भवन श्रीबाग नं. ०३ अलिबाग रायगड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

फुंडे हायस्कूल राष्ट्रीय ग्राहकदिन

उरण : रयत शिक्षण संस्थेचे, तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे कर्मवीर भाऊराव पाटील करिअर क्लबच्या माध्यमातून राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने ग्राहकांच्या समस्या आणि ग्राहक संरक्षणाची गरज या विषयावर मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी संतोष पवार, तुमडे, कुंटे, तोरणे, प्रा. दिनेश सासवडे आदींनी मार्गदर्शन केले. पूजा मुढे हिने ग्राहकांच्या समस्या व ग्राहकांचे अज्ञान यामुळे होणारी फसवणूक याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. कुंटे यांनी आभार मानले.

ठाकूर महाराज यांना जीवे मारण्याची धमकी

खारघर पोलिसांत गुन्हा दाखल

। पनवेल । वार्ताहर ।

अध्यात्मिक गुरु देवकीनंदन ठाकूर महाराज यांना परदेशातून जीवे मारण्याच्या धमकी आली आहे. याप्रकरणी खारघर पोलिसांनी एका अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

देवकीनंदन ठाकूर महाराज यांचे खारघर येथील सेंट्रल पार्क येथे २४ ते ३१ डिसेंबर दरम्यान भागवत कथा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमादरम्यान सदर प्रकार घडला आहे. परदेशातून आलेल्या या फोनवरून देवकीनंदन महाराज यांना शिवीगाळ करत मुस्लिम समुदायाविरुद्ध बोलण्यापासून परावृत्त केले आहे. यावेळी देवकीनंदन महाराज यांनी सांगितले की, त्यांना दुबईहून धमकीचा फोन आला होता, ज्यामध्ये त्यांना मुस्लिमांविरुद्ध न बोलण्यास सांगितले होते आणि जर त्यांनी सल्ल्याचे पालन केले नाही तर त्यांना ठार मारले जाईल, असे या फोनवरून सांगण्यात आले आहे. त्यानुसार खारघर पोलिसांनी देवकीनंदन महाराज यांच्या सुरक्षेत वाढ करून फोनसंदर्भात अधिक तपास सुरु केला आहे.

अष्टविनायक मंडळाची दिनदर्शिका प्रकाशित

। चिरनेर । वार्ताहर ।

मोठे भोम येथील अष्टविनायक मित्र मंडळ आणि अष्टविनायक महिला मंडळ यांच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या नवीन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या हस्ते, अष्टविनायक मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष घनश्याम पाटील यांच्या मोठेभोम येथील निवासस्थानी करण्यात आले.

यावेळी बाजीराव परदेशी, विनोद म्हात्रे, डॉ.मनिष पाटील, अलंकार परदेशी, घनश्याम पाटील, गिरीश पाटील, बी.एम. ठाकूर, सचिन घबाडी, किशोर केणी, शेखर केणी, किरण कुंभार, संजय पाटील, हरिभाऊ पाटील, रामचंद्र पाटील, विजय केणी, राजेंद्र भगत तसेच मंडळाचे युवा कार्यकर्ते व महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन राजेंद्र भगत तर आभार विजय केणी यांनी व्यक्त केले.

दागिने चोरीचा छडा

। पनवेल । वार्ताहर ।

घरकाम करणाऱ्या महिलेच्या दागिन्यांची पिशवी हरवली होती. परंतु तांत्रिक तपासाच्या आधारे सदर पिशवी पोलिसांनी हस्तगत करून त्यातील दागिने व रोख रक्कम परत मिळवून दिले. वाजेपुर या गावात राहणाऱ्या जयश्री पाटील (वय ५४ वर्षे) या पनवेलला घरकाम करण्यासाठी येत असतात. कामाच्या ठिकाणी आल्यावर त्यांनी नेहमीच्या दुकानाच्या जवळ असलेले ठिकाणी पिशवी ठेवली व काम करण्यास त्या गेल्या. मात्र कामावरून परतल्यावर त्यांना नेहमीच्या ठिकाणी सदर पिशवी आढळून न आल्याने त्या घाबरल्या. त्यांनी तात्काळ पोलीस ठाणे गाठत सदर प्रकारची माहिती पनवेल शहर पोलिसांना दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने व गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक रवींद्र पारधी यांनी सदर गुन्ह्याचा शोध सुरु केला. त्या ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेज व तेथील सुरक्षारक्षक यांची चौकशी पारधी यांनी केली असता त्यांना एका दुचाकीचा नंबर मिळाला. त्यानंबरच्या आधारे सदर गाडीमालकाचा शोध पारधी यांनी घेतला. तसेच मालकाची भेट घेऊन माहिती दिली असता पिशवीच्या साधर्म्यामुळे ते पिशवी घरी घेऊन गेल्याचे कळले. अधिक तपासात त्या महिलेचे दागिने व रोखरक्कम त्यापिशवीत मिळून आले.

त्वष्टा कासार समाजाने प्रगती साधावी

। रोहे । प्रतिनिधी ।

त्वष्टा कासार समाजाने बदलत्या मागणीनुसार व्यवसायात चिकाटीने बदल आणि प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मत वृत्त निवेदिका श्वेता वडके-दांडेकर यांनी व्यक्त केले. त्वष्टा कासार समाज संस्था अष्टमी-रोहा संस्थेच्या विठ्ठल रखुमाई मंदिराच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळा समारंभाप्रसंगी दांडेकर यांनी आपले मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे निमित्त साधून समाजाच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पहार, भेटवस्तू व सन्मानपत्र देऊन दांडेकर यांचा सत्कार करण्यात आला. अतुल डाखवे यांचादेखील सत्कार करण्यात आला. प्रत्येकाने आपल्या समाजाचे ऋण फेडण्यासाठी नेहमीच अग्रेसर असले पाहिजे. आणि याच भावनेतून आज ग्रामपंचायतींचा निकालाचा दिवस असूनही वेळात वेळ काढून मला या छान कार्यक्रमात सहभागी होता आले याचा मला आनंद होत आहे. असे त्या म्हणाल्या.

यावेळी यासपिठावर प्रसिद्ध वेशभूषाकार मा.अतुल डाखवे, ज्येष्ठ पत्रकार दिलीप वडके, उपाध्यक्ष तेजस बोथरे, सचिव केदार साळवी, खजिनदार मनिष साळवी, सदस्य संजय आर्ते, संतोष डाखवे, अमित वडके, आदि उपस्थित होते. सूत्रसंचालन हर्षद साळवी यांनी केले. श्रीविठ्ठलरखुमाई मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त श्रींच्या मुर्तीवर अभिषेक, पूजा श्री राजेंद्र एकनाथ डाखवे तसेच सत्यनारायण महापूजा श्री व सौ मंगेश एकनाथ डाखवे व महाआरती समस्त डाखवे परिवार यांच्या हस्ते संपन्न झाली. यावर्षी श्री राजेंद्र एकनाथ डाखवे यांना महाप्रसादाचा बहूमान मिळाला होता. दुपारी १२ ते ३.३० पर्यंत महाप्रसादाचा लाभ समाज बांधव व गावकरी यांनी घेतला. सदर आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा मागील ३ वर्षांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. यानिमित्ताने वरील सर्व कार्यक्रमांनी भरगच्च असा कार्यक्रम संपन्न झाला.

संपादकीय

मोदींची रेवडी?

जनतेला गोष्टी फुकट देण्याचे आश्वासन देऊन मते मिळवण्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या काही दिवसांपासून बरीच टीका करीत असतात. याला ते रेवडी वाटणे असे म्हणतात. दिल्लीमध्ये तेथील नागरिकांना आम आदमी पक्षाने वीज व पाणी जवळपास फुकटच देऊ केले आहे. त्याच जोरावर त्यांनी दिल्लीतील सत्ता मिळवली व टिकवली असा भाजपवाल्यांचा दावा आहे. गुजरातेतही ते हेच करू पाहत होते यावर त्यांचा राग होता. या सर्व तथाकथित रेवडीच्या राजकारणाच्या विरोधात भाजपवाल्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. न्यायालयाने या प्रश्नावर निर्देश द्यावेत असे भाजपला वाटते. (गंमत अशी आहे की, याच न्यायालयाने न्यायाधीशांच्या नेमणुकांच्या संदर्भातील घटनादुरुस्ती अवैध ठरवली तर तिच्यावर मात्र त्यांना आक्षेप असतो. राज्यसभेचे सभापती त्यावर थेट टीका करतात.) त्यामुळे फुकटपणाच्या राजकारणाला भाजपचा भयंकर तात्विक विरोध आहे असा कोणाचाही समज होऊ शकतो. पण असे समज आपणच निर्माण करायचे आणि नेमके त्याच्या विरोधात वर्तन करायचे हीच तर भाजपच्या राजकारणाची खासियत आहे. आपण लोकशाहीचा सन्मान करतो असे म्हणायचे असे एकीकडे म्हणायचे आणि दुसरीकडे विरोधकांच्या मागे इडी, सीबीआयच्या चौकशा लावायच्या, राज्यपालांना वाटेल तसे वागू-बोलू द्यायचे हे दोन्ही करणारा भाजप एकच आहे. आतादेखील आम आदमी पक्षावर टीका करत करत २०२४ च्या निवडणुकांसाठी त्याने रेवडी राजकारणाचा सहारा घ्यायला सुरुवात केलेली दिसते. देशातील ८१ कोटी गरिबांना २०२३ मध्ये एक वर्षभर दरमहा दरडोई पाच किलो धान्य फुकट वाटण्याचे ठरवले आहे. केंद्र सरकारने शुक्रवारी हा निर्णय घेतला. राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा २०१३ नुसार केंद्र सरकार गरिबांना तीन रुपये किलो दराने तांदूळ आणि दोन रुपये किलो दराने गहू देत होते. यापुढे वर्षभर हेच धान्य फुकट दिले जाणार आहे. एप्रिल २०२० मध्ये करोनाच्या काळात प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत गरिबांना दरडोई पाच किलो अन्नधान्य दिले जात होते. त्यावेळी सर्वच कामधंदे, व्यवसाय ठप्प असल्याने हे धान्य देणे आवश्यकच होते. त्यामुळेच इतकी मोठी साथ येऊनही तिच्यात भूकबळी गेले नाहीत. कोरोनाचे निर्बंध उठवण्यात आल्याला आता जवळपास एक वर्ष होऊन गेले. पण दर तीन वा सहा महिन्यांनी या योजनेला मुदतवाढ दिली गेली. याच दरम्यान उत्तर प्रदेश किंवा अलिकडे गुजरातच्या निवडणुका होत्या हा निव्वळ योगायोग नव्हता. तेथील मतदारांवर डोळा ठेवूनच त्या त्या वेळी मुदतवाढीचा निर्णय घेतला गेला होता. २०२३ हे तर अति महत्वाच्या निवडणुकांचं वर्ष आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, कर्नाटक आदी राज्यांच्या निवडणुका येत्या वर्षभरामध्ये होणार आहे. झारखंड आणि बिहारमधील सरकार पाडण्यात यश आले तर तेथेही निवडणुका होऊ शकतात. फार काय, मुंबई पालिकेत यश मिळालं तर लगोलग महाराष्ट्रातही निवडणुका घेऊन शत-प्रतिशत भाजपचं सरकार आणण्याचा इरादा असू शकतो. या सर्व निवडणुकांदरम्यान गरिबांची पोटे भरलेली राहणे आणि त्यांनी मोदी सरकारला त्यासाठी दुवा देणे आवश्यक आहे. त्यासाठीच ही योजना राबवली जाणार आहे. ग्रामीण भागातील ७५ टक्के लोकसंख्या आणि शहरी भागातील ५० टक्के लोकसंख्या या योजनेचा लाभ घेण्याच्या टप्प्यात असेल असे सरकारने म्हटले आहे. याचाच दुसरा अर्थ असा होतो की, इतकी लोकसंख्या ही खात्रीने दारिद्र्यरेषेखाली आणि जवळपास बेरोजगार आहे. मोदी यांचे अच्छे दिन दहा वर्षे होत आली तरी या देशात अवतरलेले नाहीत याची ही कबुलीच म्हणावी लागेल. मनरेगावर मोदी नेहमी टीका करीत असतात. पण रेशनवरच्या धान्यपुरवठ्यातील ही मनरेगासारखीच योजना आहे. तिचा आधार घेताना मात्र मोदी सरकार बहुदा ही टीका विसरून जाते. गरिबांना अन्न, वस्त्र, रोजगार इत्यादी पुरवणं ही सरकारची जबाबदारी आहेच. एरवी सरकारचे याबद्दल कौतुकही झाले असते. पण सोईचे असेल तेव्हा हे तत्व सांगायचे आणि दुसरीकडे तथाकथित रेवडीच्या नावाने गळे काढायचे या दुटप्पीपणाची प्रशंसा करणे कठीण आहे.

कोकणातील भाजीपाला प्रयोग

अनंत देशपांडे

प्रगत देशात जेमतेम चार पाच टक्के शेतकरी शेती करतात. ते शेतकरी कंपन्याच्या नावाने मोठाली शेती एकत्र करतात. त्यांना कितीही शेती बाळगता येते. त्यांना शेतीवर मोठाली यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञान वापरणे शक्य होते. प्रक्रिया उद्योग उभे करता येतात. दुसऱ्या कंपन्यांशी किंवा सुपर मार्केटशी आपल्या उत्पादनांचे करार करता येतात. त्यांना हवे असलेले उत्पादन तयार करून देता येते कारण खरेदीची आणि भावाची हमी समोरची कंपनी देते. त्यामुळे यंत्रे आणि तंत्रे यांची मागणी टिकून राहते, त्यातूनच औद्योगिक आणि सेवा क्षेत्राचा विकास टिकून राहतो. शेतीवरील लोकसंख्या औद्योगिक क्षेत्रात आणि सेवा क्षेत्रात शिफ्ट होते.

मी, शिवाजी पाटील आणि माधव कंदे असे तिघे मित्र कोकणात फिरून आलो.

या प्रवासात लोकसत्ताचे प्रतिनिधी श्री. सतीश कामत यांना भेटण्यासाठी मुद्दाम राजवाडी ब्राह्मणगाव या त्यांच्या गावी, घरी गेलो.

साठ कुटुंबाचे हे लहानसे गाव आहे. या गावातील विस कुटुंबे (जवळपास ३३%) मुंबईला राहतात.

सध्या गावात चाळीस कुटुंबे वास्तव्य करून आहेत. त्यांच्यापैकीही काही लोक शेतीतील सुगीची कामे संपल्यावर मुंबईला कामासाठी जातात. मुंबईतले मंडपवाले त्यांना शेतीतील कामासाठी गावाकडे आलेल्या सुट्याचे पैसे न कापता वर्षाचा पगार देतात.

या गावातील शेतीचे धारणा क्षेत्र प्रती शेतकरी अर्धा एकर, एक एकर, दोन एकर इतके अत्यल्प आहे. सतिशजी यांचेकडे पंधरा एकराच्या आसपास, इतकी मोठी जमीन आहे. (डाव्याच्या भाषेत ते जमीनदार, गावातले आदानी अंबानी आहेत) सतिशजी त्यांच्या गावात शेतकऱ्यांना सोबत घेऊन अनेक नवनव्या प्रकारचे प्रकल्प राबवत असतात, प्रयोग करत असतात.

त्यांच्या शेताला लागून नदी वाहते, तिला जवळपास वर्षभर पाणी असते. त्यावर सरकारी स्कीमने (गावातला एकमेव सरकारी प्रकल्प) एक छोटा सिमेंटचा बंधारा बांधलेला आहे.

त्या बांधाच्या शेजारी सतिशजींनी विहीर पाडली आहे. त्या विहिरीवरून गावाला पिण्यासाठी पाणी पुरवले जाते. याची देखभाल, खर्च, दुरुस्ती आणि अंगमेहनत गावातील लोकांचा गट करतो.

एकट्या एकट्या लहान शेतकऱ्याला नदीवर मोटार बसवून आणि पाईपलाईन करून शेतीसाठी पाणी आणणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. यावर तोडगा काढण्यासाठी त्यांनी गावातील चाळीस एकर शेतजमीन एकत्र आणली. जमीन एका ठिकाणी सलगपणे केली तर नदीवर मोटार बसवून आणि पाईपलाईन टाकून शेतीला बारमाही पाणी उपलब्ध होऊ शकते हे शेतकऱ्यांना पटवून दिले.

या स्कीमसाठी पैसे हवे होते.

या कामासाठी सतिषजींनी त्यांचे संबंध वापरून शेतकऱ्यांना खाजगी उद्योजकांकडून काही परतफेड करण्याच्या अटीवर आणि काही मदत रूपात फंड मिळवून दिला. मोटार, पाईप इत्यादीसाठी वस्तूंच्या खरेदीसाठी लागणारा खर्च सोडता, शेतकऱ्यांनी स्व-कष्टाने श्रमदानाने शेतीला पाणी पुरवठा करणारी योजना कार्यान्वित केली.

सरकारी पैशाची अपेक्षा न ठेवता या दोन्ही यंत्रणा सतीश कामत आणि गावातील शेतकऱ्यांनी स्वतः उभ्या केल्या. शेतकरी स्वतः त्या नियंत्रित करतात. सर्वजण मिळून कर्ज फेडतात, विज बिल भरतात, स्वतः त्याचे मेंटेनन्स करतात.

नदीवरून आणलेल्या पाण्यावर शेतकरी स्वतंत्रपणे आपापल्या शेतात भाजीपाल्याचे उत्पादन घेतात.

भाजीपाला विकण्यासाठी रत्नागिरीत तीन ठिकाणी किरकोळ विक्रीव्यवस्था उभी केली आहे. आठवड्यातून दोन तीन दिवस भाजीपाल्याची विक्री केली जाते.

त्यासाठी एक ॲप तयार केले आहे. ज्यात ग्राहकांनाही सहभागी करून घेण्यात आले आहे.

ग्राहक किती आणि कोणती भाजी हवी याची मागणी नोंदवतात.

शेतकऱ्यांच्या घरच्या बाया मागणीप्रमाणे उपलब्ध असतील त्या भाज्या निवडून पॅकिंग करतात. एकाच वाहनात भरून माल बाजारात जातो. उत्पादन करण्यापासून ते सरळ ग्राहकांपर्यंत विक्रीची सर्व व्यवस्था शेतकरी करतात त्यामुळे त्यांना चांगले पैसेही मिळतात.

पण शेतीच्या लहान तुकड्यात कितीसे उत्पादन निघणार?

उत्पादनाला मर्यादा असल्यामुळे हातात येणारी रक्कमही मर्यादित असते.

त्यामुळे चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याच्या बरोबरीचे जीवन जगणेही त्यांना शक्य होत नाही हे वास्तव इथे लक्षात घेतले पाहिजे.

उत्पादक ते ग्राहक ही बाजारपेठेची साखळी तयार केली आणि शेतकऱ्यांच्या हाती जास्ती पैसे आले तरी कमी जमीनधारणा असलेल्या शेतकऱ्यांचे जीवनमान चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याच्या बरोबरीचे होऊ शकत नाही. याचा अर्थ आहे या व्यवस्थेत काही किरकोळ बदल केले म्हणजे लहान शेतकऱ्यांची पाहिजे तशी प्रगती होऊ शकणार नाही हेच या उदाहरणावरून दिसून येईल.

त्यासाठी शेतीचे सर्व स्ट्रक्चर बदलावे लागेल.

शेतीबाहेर पडलेले तरुण लाखोंची पॅकेजेस मिळवतात.

अशाप्रकारे नैसर्गिकरित्या शेतीवरील लोकसंखेचा बोजा कमी होतो आणि शेतीमध्ये कमी लोकसंख्या शिल्लक राहते. ज्या देशात शेतीवर कमी माणुसबळ अवलंबून आहे ते देश प्रगत असतात.

आपल्याकडे काय आहे?

शेतीवरील लोकांचा बोजा कमी करण्याऐवजी गरीबी हटवण्याच्या नावाखाली शेतीचे तुकडे वाटण्यात आले. या तुकड्याच्या मोहापाई लोक शेतीत अडकले आणि गरीब होत गेले. देशातील गरीबी हटण्याऐवजी गरिबांची संख्या मात्र वाढत राहिली.

जमीनदारी हटवण्याच्या नावाखाली जमीन धारणा कायदा तयार केला आणि फक्त शेतकऱ्यांनाच शेती बाळगण्याला मर्यादा घालण्यात आली. याउलट सरकारनेच शेतकऱ्यांच्या लाखो एकर जमिनी संपादित करून उद्योगपतींना वाटल्या.

ग्राहकांना शेतीमाल स्वस्त खाऊ घालण्यासाठी शेतीमालावर सरकार नियंत्रण ठेऊ लागले. नियंत्रण ठेवता यावे यासाठी आवश्यक वस्तू कायदा तयार करण्यात आला.

या आणि तत्सम कायद्याच्या माध्यमातून शेतीमालाचे भाव कमी ठेवण्याचे सातत्य कायम चालू आहे.

सरकारने जाणीवपूर्वक शेती तोट्यात ठेवली.

शेती बाळगण्याचे स्वातंत्र्य नाही. शेतीमालाचे भाव पाडण्याचे सरकारचे उद्योग अविरतपणे चालू असतात.

शेती कधीही काढून घेण्याची टांगती तलवार कायम असते.

त्यात या शेतकरी विरोधी कायद्यांना कोर्टात न्याय मागण्याला परिशिष्ट ९ ने शेतकऱ्यांना बंदी घातलेली.

प्रगत देशातला आणि आपल्या देशातला हा मूलभूत फरक लक्षात न घेता.

शेतीवरील निर्बंध काढून टाकणारे मूलभूत बदल करण्याऐवजी, आहे त्या व्यवस्थेत किरकोळ बदल करून विकासाचे स्वप्न दाखवणाऱ्या आपल्याकडील राजकारणी, नितिकार अर्थपंडित आणि सल्लागार लोकांना धन्य मानले पाहिजेत.

जगात असा एखादा माणूस आहे का जो अन्नाशिवाय जगू शकतो?

श्रुती, स्मृती, वेद, शास्त्र, पुराणे, इत्यादी ग्रंथ लिहिणाऱ्यांनाही अन्नच खावे लागले असणार.

एखादा साहित्यिक, कवी असा आहे का ज्याने अन्न न खाता साहित्य अथवा कवितांची निर्मिती केली?

संतांनी बदलत्या अध्यात्मिक आणि सामाजिक जगताचा वेध घेतला त्यांनाही अन्न खावे लागले.

जगभर मोठमोठ्या योध्यांनी पराक्रम गाजवला, त्यांचे सैन्य लढले, आजही सैन्य लढते ते त्यांना अन्न उपलब्ध होते म्हणून.

न्यूटन तथा अन्य वैज्ञानिकांनी ब्रह्मांड उलगडऊन दाखवणारे अनेक शोध लावले.त्यांना अन्न उपलब्ध झाले नसते तर त्यांना ते शक्य झाले असते ?

मानवी उत्क्रांतीच्या इतिहासात एकही क्षण असा नसेल ज्याचा मुलाधार अन्न हा घटक नाही.

माणूस हा या पृथ्वीवरील सर्व प्राण्यात सर्वश्रेष्ठ प्राणी समजला जातो तो त्याच्या वेगवेगळ्या वस्तू निर्माण करण्याच्या कौशल्यामुळे.

यंत्र, तंत्र, साहित्य, संगीत, वेगवेगळ्या कलाकृती, संशोधन, अशा कितीतरी क्षेत्रात माणसाने आपल्या प्रतिभा सिद्ध केल्या त्या त्याच्या मुळाशी अन्नमुलाधर आहे म्हणून.

अन्नमुलाधार उपलब्ध होतो तो शेतीमधून.

त्याची निर्मिती करतो आपल्या रक्ताचे पाणी करणारा शेतकरी.

शेती आणि शेतकऱ्याशिवाय जगातील माणूसप्राणी क : पदार्थ आहे.

आपल्या देशात नेमका शेतकरीच अडचणीत आहे.

सरकारने त्याला कायद्याच्या बंधनात अडकवून टाकले आहे. शेतकरी हा सर्जक आहे, तो निसर्गाशी संघर्ष करून आपले उत्पादन पदरात पाडून घेतो आणि तेच तुम्हा आम्हाला उपलब्ध होते.

अन्नधान्य उत्पादन करणे हे सर्जनाचे काम आहे ते २४÷७ चालणारे असते, त्यात शेतकरी गुंतलेला असतो.

या कालावधीत सरकार आणि लुटारू त्यांचे धान्य लुटण्यासाठी काय योजना आखत असतात हे त्यांना समजतही नाही.

लुटारुंना शोधण्याचे काम शेतकऱ्यांच्या पोरांनी करायला नको ?

दुर्दैव हे की शेतकऱ्यांची पोरंच त्यांना लुटण्यात अग्रभागी आहेत, कारण सत्तास्थानी तेच विराजमान आहेत.

शेती न करणाऱ्या सर्व नागरिकांना अन्नमुलाधार उपलब्ध करून देणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ शेतकरी दिनाच्या शुभेच्छा देऊन शेतकऱ्यांच्या ऋणातून आपल्याला मुक्त होता येईल असे समजणारे धन्य आहेत.

केवळ आश्रू ढाळून भागणार नाही. शेतकऱ्यांना सरकारच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी आपापल्या परीने प्रयत्न केले तरच त्या शेतकरी दिनाच्या खऱ्या शुभेच्छा असतील.

बैलाची चोरी आणि पंतप्रधान

जेव्हा मळके कपडे घातलेला शेतकरी जेव्हा पोलीस ठाण्यात गेला - ठाण्यात असं काही घडलं की, संपूर्ण ठाणेच झाले होते निलंबित.

ही गोष्ट सन १९७९ ची आहे. अंदाजे संध्याकाळचे सहा वाजले असतील. इटावा जिल्ह्यातील उसराहार पोलीस ठाण्यात एक शेतकरी आला होता, ज्याच्या अंगावर अतिशय मळके व चुरगळलेले कपडे होते. चेहऱ्यावर मात्र त्याच्या अतिशय तेज दिसून येत होते. पोलीस ठाण्यातील एकही कर्मचारी त्या शेतकऱ्याकडे लक्ष देत नव्हता. कदाचित त्याला काहीतरी तक्रार दाखल करावयाची असेल. ठाण्यात चौकशी करत तो एका पोलिसाजवळ गेला व तक्रार करायची म्हणून सांगू लागला. पोलिसांनी त्याला कशाची तक्रार करायची म्हणून विचारलं असता, माझा बैल चोरीला गेला आहे व त्याबद्दल मला तक्रार करायची आहे असं त्या शेतकऱ्याने सांगितले.

त्या शेतकऱ्याच्या एकंदरीत पेहरावाकडे पाहून, तो पोलीस त्याच्यावर संतापला व त्यालाच उलट-सुलट प्रश्न करू लागला. 'बैल कसा चोरीला गेला? नीट सांभाळता येत नव्हता का?' तू काय करत होतास? यासारख्या प्रश्नांची सरबत्तीच त्या पोलिसाने लावली होती. बिचारा शेतकरी इतक्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे देता देता थकला व आपली तक्रार घेण्यास त्याने कळकळीची विनंती केली. मात्र पोलिसाने अधिकच चिडून तक्रार घेण्यास नकार दिला. नाइलाजाने शेतकरी खाली मान घालून निघू लागला.

पोलीस ठाण्याच्या गेटजवळ जाताच, शेतकऱ्याला मागून एका पोलिसाने आवाज दिला तसा तो थांबला, त्याने मागे वळून पाहिले. पोलीस त्याच्याजवळ आला आणि म्हणाला काही पैसे देत असशील तर तक्रार घेतो. तेव्हा शेतकऱ्याकडून ३५ रुपये लाच घेऊन त्या पोलिसाने तक्रार घ्यायची मान्य केली. तक्रार अर्ज लिहून झाल्यावर, सही करणार का अंगठा ? असं त्या पोलिसाने शेतकऱ्याला विचारले, तेव्हा शेतकऱ्याने टेबलावरील पेन व शाईचा पॅड असे दोन्हीही उचलले. पोलिसाच्या मनात प्रश्न निर्माण झाला, याने पेन व पॅड दोन्ही का उचलले असतील? याला नेमकी सही करायची आहे का अंगठा?

पोलिसाने तक्रारीचा कागद समोर केल्यावर शेतकऱ्याने त्यावर आपल्या नावाची सही केली चौधरी चरणसिंह व आपल्या खिशातून शिक्का काढून त्यावर मारला प्रधानमंत्री, भारत सरकार. आता मात्र सर्व पोलीस ठाण्याचीच पळापळ सुरू झाली. कारण तो शेतकरी म्हणजेच देशाचे पंतप्रधान व शेतकऱ्यांचे लोकप्रिय नेते चौधरी चरणसिंह होते ! हे पोलीस ठाणे शेतकऱ्यांच्या तक्रारी घेत नसल्याचं समजल्यावर, चरणसिंह मुद्दामहून मळके कपडे घालून तक्रार नोंदवायला आले होते.

- मिलिंद पाटील

.....

ॲग्रीकल्चर इन्कमवर टॅक्स (आयकर) लावला पाहिजे अशी सगळ्या करदात्यांची आग्रही मागणी असते.

हेच लोक अखंड भारत, समान नागरी कायदा, लोकसंख्या नियंत्रण कायदा यांचेही कट्टर समर्थक असतात.

शेती उत्पन्नावर आयकर लावायला काहीच हरकत नाही, किंबहुना तो लावलाच पाहिजे.

तसेच शेतकऱ्यांना या वर्षातील तोटा पुढच्या वर्षात कॅरी फॉरवर्ड करण्याची (सेट ऑफची) सवलत सुद्धा अजिबात देऊ नये.

फक्त सरकारने शेतकऱ्याला होणाऱ्या नुकसानीची आणि तोट्याची पूर्ण भरपाई रोख स्वरूपात द्यावी.

विषय संपला...

- संदीप मंगला

.....

हिंदुत्ववाद्यांनी हिंदूंना रडके लोग म्हणून जगभर प्रसिद्ध करून टाकलंय. हे उठसुठ प्रत्येक गोष्टीला रडगाणं सुरू करतात. तसा यांचा लेफ्टीस्ट-झोलाछाप लोकांना टार्गेट करण्यासाठीचा आवडता शब्द असतो रंडीरोना. ख्रिसमस आला, की संता नको संत महत्त्वाचे, ईद आली की बकऱ्यांवर दया येते, न्यू इयर आलं की पाडवा आठवतो, आरक्षणावर राग आहेच, ओरविल बंधूनी तळपदेचं जगातलं पहिलं विमानही चोरलं, बिकिनी भगवी होती म्हणून आमच्या भावना दुखावल्या, शोले मध्ये मुसलमान चाचा दाखवला म्हणून आमच्या भावना दुखावल्या, मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीचा दर घटत असला तरी आम्हाला त्यांची लोकसंख्या वाढण्याची भीती वाटते, पाश्चिमात्य विज्ञान आमच्याच शोधांवर उभं आहे. अरे एक गोष्ट सांगा जिथं तुम्ही रडत नाही! एखाद्या विधवेच्या दुःखाला रंडीरोना म्हणत हे हसू शकतात, पण यांच्या बालिश रडकुंडीला कोणी काही बोलायचं नाही बरं, नाहीतर लागलेच हे छाती बडवायला... हिंदूंना ही रडक्या बाळाची प्रतिमा मान्य आहे?

(आता हिंदूंना असं बोलला म्हणून इथं रडू नका...वीट आलाय)

- प्रथमेश पाटील

तात्पर्य : शुद्ध भक्तीबद्दल पुन्हा बोलताना भगवंत या दोन श्लोकामध्ये शुद्ध भक्ताच्या दिव्य लक्षणांचे वर्णन करीत आहेत. शुद्ध भक्त कोणत्याही परिस्थितीमध्ये विचलित होत नाही. तो कोणाचाही द्वेष करीत नाही. तसेच तो शत्रूशीही वैर करीत नाही. त्याला वाटते की, 'माझ्या वाईट पूर्वकर्मांमुळेच तो माझ्याशी शत्रूत्व करीत आहे. म्हणून प्रतिकार करण्यापेक्षा सहन करणे चांगले आहे.' श्रीमद्भागवतात म्हटले आहे की, तत्तेऽनुकम्पां सुसमीक्षमाणो भुञ्जान एवात्मकृतं विपाकम्- जेव्हा भक्तावर दुःख किंवा संकट ओढवते त्याला वाटते की, ही दुःखे किंवा संकटे म्हणजे भगवंतांची आपल्यावरील कृपाच आहे. त्याला वाटते की, माझ्या पूर्वजन्मातील दुष्कृत्यांमुळे वास्तविकपणे मी जे दुःख भोगत आहे. त्यापेक्षा पुष्कळच अधिक दुःख भोगावयास पाहिजे; परंतु भगवंतांच्या कृपेनेच मी ज्या शिक्षेस पात्र आहे ती शिक्षा मिळत नाही. भगवंतांच्या कृपेने मला अल्पशीच शिक्षा भोगावी लागत आहे. म्हणून संकटामध्ये देखील तो सदैव शांत, स्वस्थ आणि धीर असतो. भक्त हा शत्रूसहीत प्रत्येकाशीच सदैव दयेने वागतो. निर्मम म्हणजे भक्त हा शारीरिक दुःखांना आणि कष्टांना जास्त महत्व देत नाही, कारण तो पूर्णपणे जाणतो की, मी म्हणजे हे भौतिक शरीर नाही. त्याच्या ठायी देहात्मबुद्धी नसते म्हणून तो मिथ्या अहंकारापासून मुक्त असतो आणि सुखदुःखांना समानतेने पाहतो. तो सहनशील असतो आणि भगवद्कृपेने जे काही प्राप्त होते त्यातच संतुष्ट असतो. यापेक्षा अधिक काही प्राप्त करण्यासाठी महत्प्रयास करीत नसल्यामुळे तो सदैव आनंदी असतो. तो परिपूर्ण योगी असतो, कारण आध्यात्मिक गुरुकडून प्राप्त झालेल्या आदेशांचे पालन करण्यात तो दृढ असतो आणि त्याची इंद्रिये संयमित असल्यामुळे तो निश्चयी असतो. वादविवादामुळे तो डळमळून जात नाही, कारण भक्ती करण्याच्या त्याच्या दृढ निश्चयापासून त्याला कोणीही परावृत्त करु शकत नाही. तो पूर्णपणे जाणतो की, श्रीकृष्ण हेच आदिपुरुष आहेत. म्हणून त्याला कोणीही विचलित करु शकत नाही. या सर्व गुणांमुळे तो आपले मन आणि आपली बुद्धी पूर्णपणे भगवंतांवर स्थिर करु शकतो. भक्तीचा असा हा आदर्श निश्चितच दुर्मिळ आहे आणि भक्तीच्या विधिनियमांचे पालन करुन तो भक्तीच्या आदर्श अवस्थेप्रत उन्नत होतो. भगवंत यापुढेही सांगतात की, असा भक्त हा मला अत्यंत प्रिय आहे आणि त्याच्या परिपूर्ण कृष्णभावनाभावित क्रियांमुळे मी सदैव प्रसन्न असतो.

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ।।१५।।

यस्मात्- ज्याच्यामुळे; **न**- कधीही नाही; **उद्विजते**- उद्विग्न होतात; **लोकः**- लोक; **लोकात्**- लोकांपासून; **न**- कधीही नाही; **उद्विजते**- उद्विग्न होतो; **च**- सुद्धा; **यः**- जो कोणी; **हर्ष**- हर्षापासून; **अमर्ष**- दुःख; **भय**- भय; **उद्वेगैः**- आणि चिंता; **मुक्तः**- मुक्त; **यः**- जो; **सः**- तो; **च**- सुद्धा; **मे**- मला; **प्रियः**- प्रिय.

ज्याच्यामुळे कोणीही उद्विग्न होत नाही आणि जो इतर कोणामुळे उद्विग्न होत नाही, जो हर्ष आणि दुःख, भय आणि चिंता यामध्ये समभाव राखतो तो मला अत्यंत प्रिय आहे.

तात्पर्य : या श्लोकात भक्ताच्या आणखी काही गुणांचे वर्णन करण्यात आले आहे. अशा भक्ताद्वारे कोणालाही कष्ट, चिंता, भय किंवा असंतोष होत नाही. भक्त सर्वांप्रति दयाळू असल्यामुळे दुसऱ्यांना त्रास होईल असे काहीही तो करीत नाही. त्याचबरोबर इतरांनी जरी भक्ताला त्रास देण्याचा प्रयत्न कोला तरी तो उद्विग्न होत नाही. भगवंतांच्या कृपेने, तो साधनेमुळे इतका प्रगत झालेला असतो की, तो कोणत्याही बाह्य उपद्रवांनी क्षुब्ध होत नाही. वास्तविकपणे भक्त सदैव कृष्णभावनाभावित असल्यामुळे आणि भक्तीमध्ये संलग्न असल्यामुळे अशा भौतिक परिस्थितीमुळे तो विचलित होत नाही. सामान्यतः याविषयी मनुष्याला जेव्हा आपल्या शरीरासाठी किंवा इंद्रियतृप्तीसाठी काही आढळते तेव्हा तो अतिशय आनंदी होतो; परंतु आपल्याकडे नसणारी इंद्रियतृप्तीची साधने इतरांकडे पाहिल्यावर तो दुःखी होतो आणि इतरांचा द्वेष करु लागतो.

(क्रमशः)

लोकसंसद

असाही एक प्रामाणिक वाहक

या दैनंदिन धकाधकीच्या जीवनात अजूनही काही प्रामाणिक माणसे आहेत, याचा प्रत्यय, अनुभव मला आला. तो मी आपणास या वृत्तपत्राच्या माध्यमाद्वारे विशद करण्याचा प्रयत्न करीत आहे. नव्हे ते माझे हे एक कर्तव्य आहे असे मी तरी समजतो. थोडक्यात हकीकत अशी की मी दि. १६ डिसेंबर २२ रोजी शुक्रवारी संध्याकाळी साधारण ४ ते ४-४० वाजताचे सुमारास अलिबाग येथून वडखळ येथे जाण्यास निघालो. गाडीचे नाव होते मुरुड-बोरिवली. गाडीला बऱ्यापैकी गर्दी होती. वडखळ येथून त्याच दिवशी संध्याकाळी पेण येथे एका लग्नाच्या पूजेला जायचे होते. पूजेच्या जाण्याअगोदर वडखळ या गावी माझे सासूरवाडी जरा बसून पुढे जाऊ या उद्देशाने उतरलो. सासुरवाडीला घरात बसण्यासाठी गेलो असताना पँटच्या मागच्या खिशात माझे पैसे पाकीट काढण्यासाठी हात गेला व त्याचवेळी लक्षात आले की, पाकिट खिशात नाही. मला काहीच सुचत नाहीसे झाले. कारण की प्रवासाला जाण्यासाठी एटीएम मधून रु. ५०००/- एस.टी. तिकीटासाठी ठेवले. बाकी पैसे रु. ४५००/- मात्र पाकिटात ठेवले. लगेचच मी पेण एस.टी. स्टँडवर जाऊन एस.टी. वाहतूक नियंत्रक पार्श्वनाथ पाटील यांना सर्व परिस्थिती सांगितली. त्यांनी पण सहानुभूतीपूर्वक सहकार्य करीत जी.बी. गोयंदी (बसचा चालक) याच्याबरोबर स्वतःच्या मोबाईलद्वारे संपर्क केला. मी पेणला पोहचेपर्यंत बस पेण एसटी स्टँडवरुन पुढच्या प्रवासास सुटली होती. मनाशी ठरविले की आमचे जगद्गुरु नरेंद्र स्वामी महाराज काहीतरी मार्ग दाखवतील व त्यांचा नामाचा जप चालू केला. पाटील साहेब बोलत होते की प्रवासात जर कोणाच्या प्रवासाच्या नजरेत ते पाकिट आले व त्यांनी उचलले असते तर पाकिट मिळणे कठीण आहे. त्यांनी व त्यांच्याबरोबर असलेले सहकारी यांनी देखील खूप सहकार्य केले. पण काय देवाची किमया म्हणजेच साक्षात परमेश्वराची म्हणा ना त्या कंडक्टरने पाकिट शोधण्याचा खूप प्रयत्न करीत अखेर पाकिट सापडले. या गोष्टीचा उल्लेख मोबाईलवर पाटील साहेबांना केला. मला खूप बरे वाटले माझा चेहरा आनंदाने खुलला. त्याआधी मी पाकिट हरवल्याने नाराज होती. पण तेच पाकिट कंडक्टरच्या अथक प्रयत्नाने मिळाले व ते त्याने दुसऱ्या दिवशी अलिबागला परत येऊन परतीच्या त्याच एस.टी.ने आल्यावर परत केले. या गोष्टीवरुन खरच नशीब व परमेश्वराची कृपा म्हणावी ना ते पाकिट नशिबात मिळण्याचे होते. म्हणून ही सर्व धावपळ केली व त्यात यश मिळाले. खरोखरच गोंधळी (वाहक) यांनी केलेले प्रयत्न यामुळेच पाकिट मिळाले. असे मला तरी वाटते. त्याची प्रामाणिकपणाची नीती ही खरोखर आदर्शरुपी आरशासारखी आहे. असे बोलले तर त्यात काही वावगे नाही. या सर्वांबरोबरची हर्डीकर साहेब सध्या मुंबई सेंट्रल डेपो येथे कार्यरत आहेत. त्यांचाही मी आभारी राहेन त्यांनी खूप मदत केली. काहीतरी चांगले घडायचे असेल तर अनेक अडचणी येत असतात. तसेच झाले दुसरे दिवशी सकाळी गाडीची वाट पाहण्यासाठी अलिबाग एस.टी. स्टँडवर गेलो व प्रतिक्षा करीत असताना असे समजले की, गाडी लेट येत आहे. कारण वडखळ हायवेवरुन गाडी येताना तिचे एक चाक पंक्चर झाले. पण त्या वाहकांनी चालक करु शकत नसल्याने स्वतः ते चाक काढून व पंक्चर काढून पुन्हा बसविले व गाडी अखेर नेहमीच्या वेळेपेक्षा एक ते दीड तास उशिरा अलिबाग डेपो येथे आली. गाडीतून उतरताच वाहक मला शोधत होते. त्यांनी पाकिट परत केले व बोलले की पैसे व इतर पाकिटातील वस्तू तपासा. पण मी विश्वास ठेवला सरळ पाकिट हातात घेऊन त्यांचे आभार मानले. त्याला मला मनाला वाटले ते बक्षीसही दिले. आज त्यांच्यामुळे मला माझे पाकिट सहीसलामत मिळाले. पाकिटातील एकही पैसा हलला नाही. हीच खरी त्याच्या प्रामाणिकपणाची पोच पावतीच आहे. यावरुन जगात कुठेतरी प्रामाणिकपणा अजूनही आहेच हेच खरे आहे. पुन्हा एकदा त्या चालकाचा प्रामाणिकपणाला सलाम करतो.

- जीवन केळकर, अलिबाग

आयपीएलची उड्डाणे

कोचीमध्ये पार पडलेल्या आयपीएल २०२३ च्या १६ व्या हंगामासाठीच्या लिलावात कोटीच्या कोटी उड्डाणे होऊन दहा संघांच्या फ्रेंचायजींनी तब्बल १६७ कोटी रुपये खर्च केले आणि अनेक देशी-विदेशी ८० क्रिकेटपटूंना विकत घेतले. या लिलावात अनेक स्टार खेळाडूंना मोठी बोली लागली तर काही स्टार खेळाडूंकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण न केलेल्या काही नवोदित आणि अपरिचित असलेल्या जम्मू-काश्मीरच्या विव्रत शर्मासारख्या खेळाडूंनाही आयपीएलने कोट्याधीश बनवले. या लिलावाचे वैशिष्ट्य म्हणजे इंग्लंडचे अष्टपैलू खेळाडू सॅम करन, बेन स्टोक्स आणि ऑस्ट्रेलियाचा कॅमरुन ग्रीन यांच्यावर कोट्यवधींची उधळण झाली असताना भारताचा माजी कर्णधार अजिंक्य रहाणे याची अवघ्या ५० लाखांवर बोळवण झाली. विश्वविजेत्या इं

नवी मुंबईला प्रदूषणाचा विळखा

नेरुळ येथील हवा गुणवत्ता निर्देशांक ३५३ एक्युआय

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

नवी मुंबई शहरात मागील महिनाभरापासून शहरातील हवा गुणवत्ता निर्देशांक २०० ते ३०० एक्युआयहुन अधिक निदर्शनास येत आहे. शुक्रवारी नेरुळ येथील हवा गुणवत्ता निर्देशांक ३५३ असून राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. हवा गुणवत्तेत राज्यात मुंबईतील बांद्रा- कुर्ला कॉम्प्लेक्स आघाडीवर असून याठिकाणी सर्वाधिक ३९० एक्युआय त्यांनतर नेरुळचा नंबर लागत आहे. त्यामुळे नवी मुंबईची दिवसागणिक वाढत जाणाऱ्या या प्रदूषणाच्या विळख्यातून सुटका कधी होणार? असा प्रश्न नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

नवी मुंबई शहरात महानगरपालिकेच्यावतीने कंबर कसून स्वच्छतेत नवी मुंबई शहर अव्वल येण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे . राहण्याजोग्या शहरात नवी मुंबईचा दुसरा क्रमांक लागत आहे. मात्र या नागरिकांच्या पसंतीस उतरणाऱ्या शहराला दिवसेंदिवस प्रदूषणाचा विळखा आणखीन घट्ट होत चालला आहे. राज्यातील



चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र असलेल्या चंद्रपूरचा हवा गुणवत्ता निर्देशांक देखील मुंबई नवी मुंबई पेक्षा कमी आहे. त्याठिकाणी कोळशापासून मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती होत असून हवेत मोठ्या प्रमाणावर धूर पहावयास मिळतो. तरीदेखील तेथील हवा गुणवत्ता मध्यम प्रकारात मोडत आहे. मात्र, नवी मुंबई आणि मुंबई मध्ये दिवसेंदिवस हवा गुणवत्ता ढासळत असल्याचे समोर येत आहे. एमआयडीसी मधील औद्योगिक कंपन्यांमधून सोडणारा वायू, शहरातील विकास कामे, रस्त्यावरील वाहने इत्यादी कारणामुळे शहरातील हवा गुणवत्ता खालावत आहे. शहरातील महापालिकेचे ऐरोली आणि नेरुळ से.१९अ येथील हवा गुणवत्ता केंद्र बंद असल्याने याठिकाणीची हवा गुणवत्ता निदर्शनास येत नाही, तर महापे कोपरखैरणे येथील हवा गुणवत्ता निर्देशांक २०९ तर नेरुळ येथील हवा गुणवत्ता निर्देशांक ३५३ एक्युआय आहे.

सुडोकू

6	9					2	1	
		7	1	6	2	8		5
2		8						
7				2		1		
8	2	3				4	6	9
		9		8				7
						9		4
9		1	7	4	3	6		
	6	4					7	1

शरनिवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

3	9	5	7	8	6	4	2	1
2	1	4	9	3	5	7	8	6
7	6	8	1	4	2	5	3	9
9	8	2	4	7	1	3	6	5
1	3	7	6	5	9	8	4	2
5	4	6	3	2	8	9	1	7
8	7	9	2	1	4	6	5	3
6	5	1	8	9	3	2	7	4
4	2	3	5	6	7	1	9	8

PRESS SERVICES OF INDIA

म हत्त्वाचे

मोटारसायकलची चोरी

पनवेल : राहत्या इमारतीच्या खाली पार्किंगमधून अज्ञात इसमाने मोटारसायकल चोरी करून नेल्याने याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हसीब हमीद शेख (वय २२ वर्षे) यांची २० हजार रूपये किमतीची बजाज कंपनीची निळ्या/काळ्या रंगाची पल्सर २२० सीसी मोटारसायकल क्र. एमएच ४६ एटी २१२३ हि गाडी मार्केट यार्ड येथील राम भोईर अपार्टमेंट या राहत्या इमारतीच्या खाली असलेल्या पार्किंगमध्ये पार्क केली असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने ती मोटारसायकल चोरी करून नेली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दारू विक्रीवर कारवाई

पनवेल : तालुक्यातील बंबावीपाडा येथे चहाच्या टपरीमध्ये विनापरवाना दारू विक्री करणाऱ्यांवर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली असून त्याच्याकडून देशी दारूच्या २७ बाटल्या जप्त करण्यात आले आहे. बंबावीपाडा येथे एक इसम चहाच्या टपरीमध्ये विनापरवाना दारू विक्री करताना पनवेल शहर पोलिसांना आढळून आला. यावेळी पोलिसांनी त्याच्या टपरीमधून देशी दारूच्या एकूण ९४५ रू किंमतीच्या २७ बाटल्या जप्त केल्या आहेत.

साप चावल्याने इसमाचा मृत्यू

पनवेल : तालुक्यातील नावडेगाव येथे घराच्या बाजुला असलेला खाडी किनारी साप चावल्यामुळे एका इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. यासंदर्भात तळोजा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. रामआशिष छोटेलाल शर्मा (वय २७ वर्षे) याला त्याच्या घराच्या बाजुला असलेला खाडी किनारी साप चावला. त्याच्या मित्रांनी त्याला रिक्षातून उपचाराकरीता रुग्णालयात दाखल केले होते, परंतु दवाउपचार चालू असतांना त्याचा मृत्यू झाला. यासंदर्भात तळोजा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

ऑनलाईन फसवणूक

पनवेल : शहरातील एका इसमास कार विकत घेण्याच्या बहाण्याने वेगवेगळ्या फोन वरून कॉल करून दीड लाखांची ऑनलाईन फसवणूक केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान कायदाअंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.शहरातील उरण नाका येथील रियलइस्टेट व्यापारी दिगंबर पवार (वय ३४ वर्षे) यांनी त्यांच्या मालकीची कार एमएच ४६ बीच्ही ६५०९ ही विकण्यासाठी ओ.एल.एक्स ऑनलाइन ॲपवर टाकली होती. त्यांना अज्ञात इसमांनी वेगवेगळ्या मोबाइलवरून फोन करून कोणतीही माहिती न देता त्यांच्या बँक खात्यातून एकूण १ लाख ४८ हजार ९९४ रूपयाची ऑनलाईन आर्थिक फसवणूक केली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान कायदाअंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

उसर खुर्द शाळेस पुरस्कार

। तळे । वार्ताहर ।

स्वदेश फाउंडेशन मार्फत सर्वोत्कृष्ट शाळा निवडण्यासाठी २०१९ मध्ये सुरुवात झाली आणि सर्वेक्षण सुरू झाले विद्यार्थ्यांची गुणवत्ता शाळेची इमारत, स्वच्छता, शिस्त आणि येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत देवो भव वृत्तीने करणे सर्व निकष प्राप्त झाल्यामुळे रायगड जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्काराची मानकरी ठरली ही अभिनव ज्ञान मंदिर उसर खर्द शाळा. आज रायगड जिल्हा परिषदेमध्ये स्वदेस फाऊंडेशन च्या वतीने आयोजित केलेल्या समारंभात अभिनव ज्ञान मंदिर उसर खर्द शाळेला सर्वोत्कृष्ट पुरस्कार, ५ लाख रुपये,

व प्रमाणपत्र, ट्रॉफी देवून डॉ किरण पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी रा.जि.प व झरीना स्क्रुवाला संस्थापक स्वदेस फाऊंडेशन व मंगेश वांजे मुख्य कार्यकारी अधिकारी स्वदेस फाऊंडेशन यांच्या हस्ते देवून गौरविण्यात आले.

शाळेची भव्य इमारत, स्वच्छ सुंदर भव्य पटांगण, स्वच्छ स्वच्छतागृह, सदादीत शाळेची बाग, संगणक कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, शिक्षक कक्ष, प्रार्थना हॉल आणि ज्ञान रचना वाद अध्यापन वर्ग, प्रत्येक वर्ग डिजिटल, प्रशिक्षित अनुभवी मेहनती शिक्षक वर्ग, कष्टाळू शिपाई, लेखनिक व उत्कृष्ट मार्गदर्शक मुख्याध्यापिका असा एका हेतूने भरलेल्या कर्मचारी वर्गाचे संपूर्ण रायगड जिल्ह्यांतून तळा तालुक्यातून तसेच उसर पंचक्रोशीतील स्थानिक स्वराज्य संस्थेचे पदाधिकारी, संस्था पदाधिकारी, शासकीय अधिकारी, ग्रामस्थ, पालक, माजी विद्यार्थी यांच्या कडून विद्यालयाचे कौतुक होत आहे.

याच गोष्टीचा विचार व आदर्श वा बोध घेऊन इतर शाळेनेही प्रयत्न नक्कीच करावा. जेणेकरून शाळा-शाळांमध्ये स्पर्धा होऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढेल आणि ती टिकली ही जाईल.

दागिन्यांची चोरी

पनवेल : शहरातील ऑफिसच्या जिन्याच्या बाजूचे ग्रील उचकटून आत प्रवेश करून अज्ञात इसमाने केबिनमधील ड्रॉवरमध्ये असलेले सोन्यांच्या दागिन्यांसह इतर ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. शहरातील निलकंठ लँडमार्क या ठिकाणी असलेल्या दोन ऑफिसच्या जिन्याच्या बाजूने असलेल्या ग्रील उचकटून आत प्रवेश करून अज्ञात इसमाने केबिनमधील ड्रॉवरमधून सोन्याचे दागिने, मनगटी घड्याळे, रोख रक्कम, लॅपटॉप यांच्यासह इतर ऐवज असा मिळून जवळपास २ लाख ८३ हजार ५०० रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दोन टन प्लास्टिक पिशव्या जप्त

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

प्लास्टिकमुक्त नवी मुंबई शहर हे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी शहरातील आठ ही विभागात प्लास्टिक प्रतिबंधात्मक जनजागृती, प्लास्टिक पिशव्याऐवजी कापडी पिशव्यांच्या वापराची सवय नागरिकांना लागावी यादृष्टीने मार्केट्समध्ये कापडी पिशव्यांचे विनामुल्य वाटप असे उपक्रम राबविण्याबरोबरच प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाई मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहेत.

अशाच प्रकारची प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशव्यांवरील धडक कारवाई करीत तुर्भेतून २ टन ३० किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त केला आहे.

तसेच ५० हजार रुपये इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. १० दिवसांपूर्वीच तुर्भे विभागातूनच १ टन २०० किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले होते. त्यानंतर त्याच विभागात ही दुसरी मोठी कारवाई करण्यात आलेली आहे.

या कारवाईमध्ये तुर्भे येथील मसाला मार्केट मधील विधी प्लास्टिकचे गोडाऊन, ग्रोमा सेंटरमधील गाला ब्रदर्स, जयेश कुमार, सिंघवी प्लास्टिक या व्यावसायिकांवर दुसऱ्यांदा प्रतिबंधात्मक प्लास्टिक वापराचा गुन्हा दाखल झाल्याने प्रत्येकी १० हजार रु. इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली.

त्याचप्रमाणे त्यांच्याकडील प्लास्टिक पिशव्यांचा साठाही जप्त करण्यात आला व त्यांस समज देण्यात आली.

राजन मेथा यांचे निधन

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव येथील विजय चुनीलाल मेथा यांचे लहान बंधु प्रतिष्ठित व्यापारी व अशोकदादा साबळे विद्यालयाचे स्कूल कमिटी चेअरमन राजन चुनीलाल मेथा यांचे शनिवार (दि.२४) हृदयविकाराच्या आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय-५९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात १ भाऊ, १ बहीण, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने मेथा कुटुंबियांवर तसेच त्यांच्या मित्रपरिवारावर, नातेवाईकांवर व नवरात्र मित्रमंडळ माणगाव यांच्यावर शोककळा पसरली आहे.

विद्युत तारांमुळे अपघाताची शक्यता

। सुधागड/पाली । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील पाली बाजारपेठेत भोराई कॉम्प्लेक्स जवळ डॉक्टर नितीन दोशी यांच्या दवाखान्या समोर विद्युत खांबावरून केबल कित्येक दिवस लोंबकळत आहे. सदरची केबलचा एक टोक जमीनीवर पडली आहे. तर दुसरे टोक हे विद्युत खांबावर आहे. या केबलमधून विद्युत प्रवाह होऊन अपघाताची शक्यता नाकारता येऊ शकत नाही.

त्यामुळे या परिसरात राहणारे नागरीकांनमध्ये भितीचे वातावरण आहे. सदरची केबल ही बीएसएनएलनची असल्याचे बोलले

जात आहे. याबाबत महावितरण तसेच बीएसएनएल कार्यालयात बाबत वारंवार तक्रार करुनही आज हि केबल जैसे थे आहे.

भोराई कॉम्प्लेक्स या इमारतीमध्ये डॉक्टर नितीन दोशी यांचा दवाखाना आहे. त्यामुळे दवाखान्यात उपचारासाठी रुग्ण येत असता तसेच शेजारी फलांचे, कडधान्य विक्रीते ही बसलेले असतात. एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. त्यामुळे या विद्युत खांबावरील लोंबकळणाऱ्या धोकादायक केबल दूर करण्यात यावी, अशी मागणी येथील ग्रामस्थ करत आहेत.

राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप

। पाली । वार्ताहर ।

तरुणांचा ध्यास गाव शहराचा विकास या संकल्पनेवर आधारित सात दिवसीय निवासी शिबीर भार्जे या दत्तक गावी १७ ते २३ डिसेंबर दरम्यान संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह गीता पालरेच्या यांच्या हस्ते झाले. तर समारोप रवींद्र लिमये यांच्या उपस्थितीत झाला. या दिवशी शिबिरामध्ये स्वयंसेवकांच्या श्रमदानातून ग्रामस्वच्छता, वनराई बंधारा बांधणे, गाव सुशोभित करणे, गावात विविध प्रकारची जागृती निर्माण करण्याचे काम करण्यात आले. पथनाट्य, नाटुकली आणि नृत्याविष्काराच्या माध्यमातून गावकऱ्यांमध्ये जलसंवर्धन, अंधश्रद्धा निर्मूलन, पर्यावरण संवर्धन, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री-पुरुष समानता, आहार-विहार आणि योग प्राणायाम, उच्च शिक्षण, मराठी शाळांचे महत्त्व इत्यादी सामाजिक प्रश्नांप्रती जागृती निर्माण करण्यात आली. या शिबिरा दरम्यान अनुसया पवार, माधुरी जाधव, कैलास म्हात्रे, सुधागड एज्युकेशन सोसायटीचे संचालक तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांचे सहकार्य लाभले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक प्रा. टी. पी. मोकल, गट विकास अधिकारी अशोक महामुनी, तालुका कृषी अधिकारी झगडे यांनी शिबिराला भेट देऊन मार्गदर्शन केले.

चिरनेरमध्ये पोलिसांसाठी आरोग्य शिबीर

। चिरनेर । वार्ताहर ।

वर्चस्व युवा फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य कोकण विभागीय अध्यक्ष नीता माळी पोलीस मित्र प्रसाद हनुमंते व महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे यांच्या संयुक्त विद्यमाने २३ डिसेंबर रोजी शुश्रुषा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पनवेल येथे मोफत हृदयरोग तपासणी शिबीर तसेच नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना अंतर्गत सदर शिबिर राबविण्यात आले होते. शिबिरात ५० पोलीस कर्मचाऱ्यांचे मोफत ब्लड प्रेशर, शुगर टेस्ट व ईसीजी करण्यात आली. हृदयरोग उपचाराबरोबरच नेत्र तपासणी ही करण्यात आली. यात जवळजवळ ३० ते ४० पोलीस कर्मचाऱ्यांना मोफत चष्मांचे वाटप करण्यात आले. या शिबिरासाठी पळस्पे महामार्ग पोलीस केंद्र मार्गदर्शक कुलवंत कुमार सारंगळ, अरविंद साळवे, तानाजी चिखले,संदीप भागडीकर, श्रीमती मोरे, गणेश बिल्कुल, कुमार लोंढे, डॉ. राजेंद्र क्षिरसागर, डॉ. आयुष्या खान, रमेश कदम उपस्थित होते.

संविधान बचाव यात्रा

। माणगाव । वार्ताहर ।

जिल्ह्यात सुरू झालेल्या नफरत छोडो संविधान बचाव यात्रेचा समारोप ९ डिसेंबर रोजी महाड शहरात करण्यात आला. या संविधान यात्रेमध्ये समाजवादी नेते डॉ. जी. जी. पारेख, माजी खा. हुसेन दलवाई यांच्यासह सामाजिक नेत्या उल्का महाजन, सुरेखा दळवी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गंगाधर साळवी यांनी केले. त्याचबरोबर त्यांनी संविधानावर आधारीत पोवाडा सादर केला.

या संविधान यात्रेत हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स, तसेच कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड व हिरवळ रात्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थी संविधान बचाव अशा घोषणा देऊन सहभागी झाले.

उपस्थित मान्यवरांनी संविधान वाचवणे का गरजेचे आहे त्यावर मार्गदर्शन केले. शिवाजी चौक, चवदारतळे, भीमनगर, काजळपुरा साळीवाडा नाका, भगवानदास बेकरी मार्गे शिवाजी चौक असे मार्गक्रमण करून ही यात्रा डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात येऊन संपन्न झाली.

प्रकाश कांबळे यांना पत्नीशोक

। उरण । वार्ताहर ।

उरण बौद्धवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते प्रकाश कांबळे यांच्या पत्नी पुष्पा कांबळे यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार (दि.२३) निधन झाले.

त्यांच्या पश्चात पती, मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. बोरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक व इतर क्षेत्रातील जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होते. कालकथित कांबळे यांचा पुण्यानुमोदन विधी व शोकसभा रविवार दि. १ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता समाज मंदिर हॉल उरणबौद्धवाडा येथे होणार आहे.

सावर्डे विद्यालयात विविध कार्यक्रम

। चिपळूण । वार्ताहर ।

सह्याद्री शिक्षण संस्था संचालित गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात साने गुरुजी जयंती व राष्ट्रीय ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला साने गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे उद्धव तोडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

सानेगुरुजी यांच्या कार्याची ओळख करून देणारे व जागो ग्राहक जागो यासंबंधी माहिती देणारे भित्तीपत्रक कविता हळदीवे, सिध्दी सावंत यांनी तयार करण्यात

आले होते. त्याचे उद्घाटन समीक्षा बागवे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी ग्राहकांचे हक्क, अधिकार याचे विवेचन आमित साळवी यांनी केले. विद्यार्थी मनोगतात सिया सावंत या विद्यार्थिनीने सानेगुरुजींच्या जीवनकार्याची माहिती दिली. या कार्यक्रमाचे संयोजन कुमारी श्यामल म्हादे, अविनाश पोतदार यांनी केले होते.

या कार्यक्रमाला राजेंद्र वारे, विजय काटे, उद्धव तोडकर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

आनंदी जगण्यासाठी खेळ उपयुक्त

। चिपळूण । वार्ताहर ।

खेळ मानवास तंदुरुस्त व मानसिकतेने सशक्त बनवायला उपयुक्त आहेत. आनंदी जीवन जगण्यासाठी खेळ नेहमीच उपयुक्त ठरत असतात. संकटावर मात कशी करावी, यश-अपयश कसे पचवावे हे खेळ आपल्याला शिकवत असतात. नेतृत्वगुण, समयसूचकता इत्यादी बाबींची शिकवण या खेळामधूनच आपणास मिळते. प्रतिस्पर्ध्यांचा नेहमी सन्मान ठेवा, असे आवाहन मुख्याध्यापक राजेंद्र वारे यांनी क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांना केले. सह्याद्री शिक्षणसंस्था संचलित गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या क्रीडा महोत्सवाची सुरवात झाली. उद्घाटन प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र वारे, उपमुख्याध्यापक विजय काटे, पर्यवेक्षक उद्धव तोडकर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. श्रीफळ वाढवून व क्रीडाज्योत प्रज्वलित करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. क्रीडा स्पर्धेच्या कालावधीत सर्व नियमांची अंमलबजावणी करण्यासंदर्भातील शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क-
८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

रमेश दामोदर वत्सराज, प्रथम पुण्स्मरण, देऊळवाडी, उरण

श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगर हाउसफुल

सलग सुट्ट्यांमध्ये पर्यटनाला उभारी, नववर्षाच्या स्वागताला व्यावसायकांची जय्यत तयारी

। दिघी । वार्ताहर ।

नाताळच्या सुट्ट्यांमुळे श्रीवर्धन तालुक्यातील सर्वच रिसॉर्ट फुल्ल झाल्याचे पाहायला मिळत आहेत. दिवाळीनंतर पर्यटन फुलल्याने व्यावसायिकांमध्ये देखील आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. तालुक्यातील सर्वच ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळे आणि हॉटेल, लॉज, घरगुती राहण्याची, जेवणाची ठिकाणे पर्यटकांनी बहरलेली दिसत आहेत.

मागील दोन वर्षे सर्वत्र कोरोनाचे सावट असल्याने अनेक उत्सव नियमांचे पालन करत साजरे करण्यात आले. त्यामुळे यावेळी सुट्ट्या सुरू होताच अनेक घरात पर्यटनाचे बेत आखले गेले. यावर्षीच्या पर्यटनाची हौस भागविण्याची जणू काय संधीच मिळाली असून अनेकांनी पर्यटनासाठी कोकणाला पहिली पसंती दिलेली आहे. त्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील सर्वच रिसॉर्ट फुल्ल झाल्याचे पाहायला मिळाले. दिवाळी नंतर पर्यटन फुलल्याने व्यावसायिकांमध्ये देखील आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

दिवेआगर येथे लांबलचक समुद्र चौपाटी असल्याने येथे समुद्राची ओढ सगळ्यांनाच असते. उसळणाऱ्या लाटा, फेसाळलेले निळेशार पाणी, किनाऱ्यावरील सोनेरी वाळू, समुद्रातील साहसी खेळ, बोटिंग यामुळे कोकणात अगदी फॉरेन टूरचा फील येतो. यातच कोकणातील वळणदार रस्ते, उंच डोंगर आणि घनदाट झाडी यामुळे कोकण कायमच हवाहवासा वाटतो. धार्मिक पर्यटन करणाऱ्यांसाठी श्रीवर्धन मधील सोमजाई मंदिर, पेशवे मंदिर, दक्षिण काशी हरिहरेश्वर तसेच दिवेआगर श्री सुवर्णगणेश मंदिर आणि मुरुड जंजिरा किल्ला असे अनेक पर्याय आहेत. समुद्र किनाऱ्यावर मौजमजा करणाऱ्या पर्यटकांसाठी श्रीवर्धन, दिवेआगर, वेळास, आदगाव, कोंडविल असे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. सद्या थंडीने जोर धरला असून, थंड हवेच्या ठिकाणांचाही पर्याय आहे. गेली महिनाभर राज्यभरातील शालेय सहलींनी दिवेआगर येथील पर्यटनाचा अनुभव घेतला आहे. कारण येथील सर्वच गावांमधील मंदिरे, जुनी घरे, छोट्या वाड्या हे सारेच पाहण्यासारखे असते. जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुका पर्यटनाच्या मुलभूत सुविधांमध्ये आपला ठसा उमटवीत आहे. यावेळी हॉटेल, रेस्टॉरंट, निवासी न्याहरी योजना, घरगुती खानावळी आदी पर्यटनावर आधारित विविध प्रकारच्या सेवा देणाऱ्यांनी जय्यत तयारी केली आहे. यावर्षी लाखो पर्यटक श्रीवर्धनला डेरा ठोकणार असे चित्र पहायला मिळत आहे. मागील दोन वर्षे लॉकडाऊनमुळे निर्माण झालेली स्थिती यामुळे कोकणातल्या पर्यटन उद्योगासमोर मोठी आव्हानांची होती. पुढील काळात विस्कळीत झालेली आर्थिक घडी बसली जात आहे. सध्या दिवेआगर मध्येच महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ परवाना अंतर्गत निवास आणि न्याहरीचे ६०० हुन अधिक हॉटेल व घरगुती साधारण २०० व या व्यतिरिक्त २५ एक प्रमुख खानावळी आहेत. नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांची रेलचेल सुरू झाल्याने व्यापारी वर्गाला सुगीचे दिवस आल्याचे आनंद वातावरण तयार झाले आहे.

म ह त्त्वा चे

जनता विद्यालयात रंगमंचाचे उद्घाटन

खोपोली : केटीएसपी मंडळाच्या जनता विद्यालयाच्या रंगमंचकावरून अनेक नाटकाचे प्रयोग झाले आहेत. बुधवारी खोपोली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक हरेश कळसेकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. एकापेक्षा एक डान्स स्पर्धे तील सोनाली पवार यांची लावणी आकर्षण ठरली आहे. याप्रसंगी रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अर्थसभापती चित्रा पाटील, खालापूरच्या माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम, सुरेखा गुरव, माजी नगराध्यक्ष दत्ताजीराव मसुरकर, केटीएस मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यवाहक किशोर पाटील, राजू अभाणी, राजू ठक्कर, अनंता हाडप, अबू जळगावकर, दिलीप पोरवाल आदी उपस्थित होते.

■ पनवेल चर्चमध्ये येशु जन्मांचा देखावा बनविण्यात आला.

राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा

। तळा । वार्ताहर ।

तळा रास्त भाव धान्य दुकान नंबर १ मध्ये राष्ट्रीय ग्राहक दिन तळा तहसीलदार ए एम कनशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला.

यावेळी रेशन दुकानदार अध्यक्ष बबन भौड, रमेश कोलवणकर, तानाजी कालप, गणेश वाघमारे, चंद्रकांत रोडे, राजाराम तळकर, किशोर पितळे, संदीप आखाडे, मोरेश्वर फुलारे, राजेंद्र कुडेकर, मिलिंद दलाल इत्यादी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना ग्राहक दिनाचे महत्व सांगण्यात आले. ग्राहकांना योग्य मान द्यावा असे आवाहन करण्यात आले.

शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणाऱ्यांचा सन्मान

। चिरनेर । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व प्राथमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये चिरनेर येथील पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील विद्यालयाचे चार विद्यार्थी आणि कळंबुसरे येथील प्राथमिक शाळेचे चार विद्यार्थी उत्तीर्ण होऊन यश संपादन केले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याध्यापक सुरदास राऊत यांनी दिली.

यात अक्षरा जितेंद्र ठाकूर हिने या परीक्षेत २९८ पैकी २३४ गुण मिळविले. तर शेकडा गुण ७८.५२ टक्के गुण मिळवून, शाळेत प्रथम आणि तालुक्यातही गुणानुक्रमे प्रथम येण्याचा मान तिने पटकाविला आहे. तर जिज्ञेशा राकेश फुंडेकर हिने या परीक्षेत २९८ पैकी १५४ गुण मिळवून शेकडा गुण ५१. ६७ टक्के तसेच यश उदय ठाकूर याने २९८ पैकी १५२ गुण मिळवले.त्याला शेकडा गुण ५१.०० टक्के तर दिया राजेंद्र चिर्लेकर हिने २९८ पैकी १४८ गुण मिळवले. तिला शेकडा गुण ४९.६६ टक्के गुण प्राप्त झाले. दरम्यान अविष्कार पाटील, श्रीमत पाटील, सूर्य पाटील व सोनाक्षी पाटील या कळंबुसरे प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले असून, हे चारही विद्यार्थी सध्या चिरनेर येथील परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक विद्यालयात सहावी इयत्तेत शिक्षण घेत आहेत.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थापक-अध्यक्ष पी.पी.खारपाटील, राजेंद्र खारपाटील, समीर खारपाटील, सागर खारपाटील, सुरदास राऊत, आनंद चिर्लेकर तसेच अन्य मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहेत.

अबॅकस स्पर्धेत एस.जी.कुडेकर स्कूलचे यश

। म्हसळा । वार्ताहर ।

विद्यार्थ्यांची गणितीय आकडेमोड जलद गतीने करता यावी तसेच मेंदूच्या विचारशक्तीला योग्य दिशा मिळण्यासाठी अबॅकस स्पर्धेचे नियोजन केले होते. माणगाव येथील सुधाकर नारायण शिपूरकर स्कूल मध्ये झालेल्या अबॅकस स्पर्धेत म्हसळा येथील एस. जी. कुडेकर इंटरनॅशनल स्कूल च्या ४ थी च्या २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी १० विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून आपल्या शाळेसह तालुक्याचे नाव उज्वल केले.

सम्स-ऍडिशन आणि सब्स्ट्रॅक्शन विदाउट फॉर्मुला स्पर्धेत रुही दळवी, रिचा जैन, आर्या जंगम आणि प्रदर्श वाख तसेच स्पीड रायटिंग स्पर्धेत कृपा करंबे, विहान लटके, धून जैन, जीत बोर्ले आणि मेहुल मोरे आणि नंबर्स टू बिड्स अँड बिड्स स्पर्धेत हर्षिता पयेर आणि प्रदर्श वाख या विद्यार्थ्यांनी विशेष यश प्राप्त केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सुरेश कुडेकर, श्रीमती. गजगे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

शाळांना शैक्षणिक साहित्य भेट

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

माहिरा हेल्प फाऊंडेशन आणि योगा फ्रेंड्स ग्रुप नवीन पनवेल यांच्या विद्यमाने सुधागड तालुक्यातील सिध्देश्वर खुर्द ठाकूरवाडी व आदिवासीवाडी रा.जि.प शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तर आणि शालोपयोगी वस्तुंचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी माहिरा हेल्प फाऊंडेशनच्या महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्षा रिमा रावल, जया त्रिपाठी, मनिषा माने व अजित काकडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक दंत यांनी केले आणि मान्यवरांचे आभार भगवान साजेकर यांनी मानले .

राजिप भाले शाळेचा द्वितीय क्रमांक

। माणगाव । वार्ताहर ।

स्वदेस फाऊंडेशन ही स्वयंसेवी या संस्थेच्या शिक्षण विभागाने सर्वोत्कृष्ट शाळा ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत सुमारे ४३९ प्राथमिक व माध्यमिक शाळांनी सहभाग घेतला होता.

दोन चार वर्षे सतत भेटी, सर्वेक्षण, मूल्यमापन करून २६ शाळांची फायनल मध्ये निवड करण्यात आली. त्यात भाले शाळेने राबवलेला ऑनलाईन इलेक्शन व इतर ५० उपक्रमांचा विचार करून शाळेला द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. शुक्रवार (दि.२३) जिल्हा परिषद कार्यालय अलिबाग येथे सभागृहात झालेल्या कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते व स्वदेस फाऊंडेशन संस्थापिका झरीन स्क्रूवाला, मंगेश वांगे, पुनीता गुरव, सुनीता खरात, अस्मिता चाळके, शिवाजी खानविलकर, दत्तात्रय शिनगारे, विजयनाथ लाड, दीपक चव्हाण, संतोष बापट उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना पाणी बचतीचे मार्गदर्शन

। नेरळ । वार्ताहर ।

झुगरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ आणि शुद्ध पाणी याबाबत कार्यशाळा आयोजित केली होती.

सहज सेवा फाऊंडेशनच्या माध्यमातून हि कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विनय बर्वे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नांदगाव केंद्रातील शाळांना पाणी शुद्धीकरण यंत्र, देण्यात आले असून त्या संदर्भात माहीती व पाणी बचत, शरीराला आवश्यक असणारे पाणी, शुद्ध अशुद्ध पाणी याविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देऊन, विद्यार्थ्यांचा प्रश्न आणि शंका यांची समाधानकारक उत्तरे त्यानी दिली. विद्यार्थ्यांनी पाणी बचत करून पाण्याचा अपव्यय टाळण्याची शपथ घेतली.यावेळी रवी काजळे, आनंद कराळे, संतोष कोरडे, सतीश घावट उपस्थित होते.

आनंदीबाई प्रधान महाविद्यालयात श्रमसंस्कार

। नागोठणे । वार्ताहर ।

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाचे आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत प्लास्टिक मुक्त भारत या थिमवर आधारीत नागोठण्याजवळील पिगोंडे ग्रामपंचायतीच्या परिसरात आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय विशेष हिवाळी निवासी शिबाराचे उदघाट्न स्थानिक शाळा समिती सदस्य अनिल काळे यांच्या हस्ते पार पडले.

महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संदेश गुरव यांनी श्रमसंस्कार शिबारातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, निर्माण व्हावा, तसेंच या शिबारातून निर्मलग्राम, सर्वांगीण ग्रामविकास, बंधारा बांधणे, पाणी आडवा पाणी जिरवा योजना राबवणे. इ. कामातून होत आसलेल्या श्रमदानाचे महत्व सांगितले. यावेळी संतोष कोळी, प्रा. श्रीकृष्ण तुपारे,कांचन माळी, सर्व ग्रामपंचायत सदस्य, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.

शैलेश पालकर यांना दर्पण पुरस्कार

। पोलादपूर । वार्ताहर ।

मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मरणार्थ सन २०२१/२२ चा राज्यस्तरीय आचार्य बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार (कोकण विभाग) पत्रकारिता क्षेत्रामध्ये गेली ३५ वर्ष सामाजिक दृष्टिकोनातून ३२ वृत्तपत्रांसाठी काम करीत आहेत.

जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांना राज्यस्तरीय आचार्य बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला आहे.

हा पुरस्कार एका खास समारंभात दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या मूळ गावी पोंभुर्ले, ता. देवगड जि. सिंधुदुर्ग दर्पण सभागृहात ६ जानेवारी २०२३ रोजी सन्मानाने देण्यात येणार आहे.

राष्ट्रीय गणित दिवस साजरा

। माणगाव । प्रतिनिधी ।

तालुक्यातील जवाहर नवोदय विद्यालय, निजामपूर रायगड येथे गुरुवार, दि. २२ डिसेंबर सकाळी ठिक आठ वाजता दैनंदिन परिपाठांतर्गत राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य के. वाय. इंगळे, गणेश अडोडे, सुनिता जैसवार, विष्णू दत्त, केदार केंद्रेकर, नम्रता काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीला नवोदय प्रार्थनेनंतर महान गणित तज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी विद्यालयाच्या विविध विद्यार्थ्यांनी विविध गणित प्रकारांचे सादरीकरण केले. यात विश्वजित नाचपल्ले, श्रीप्रिया घाडगे, संयोगिता गायकवाड, स्वरांजली गर्जे, सुहाना चौहान, तानवी सेन यांचा सहभाग होता.

यानंतर प्राचार्य के. वाय. इंगळे आणि गणेश अडोडे यांनी दैनंदिन जीवनात गणिताचे महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणित विभाग आणि सांस्कृतिक विभागाचे तसेच सर्व शिक्षक, कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

आरोग्य शिबिराला प्रतिसाद

। नेरळ । वार्ताहर ।

भारतीय जनता पक्षाच्या वतीने २४ डिसेंबर रोजी जुम्मापट्टी येथे आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. आदिवासी बहुल भागातील या शिबिरात तब्बल १५६ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १७ रुग्णांना रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमध्ये पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले आहे.

या शिबिराचे उद्घाटन मंगेश म्हसकर, नरेश मसणे, उषा पारधी, प्रा. डॉ रुपाली तासगावकर, संतोष शिंगाडे, प्रकाश पेमारे, पूजा व्यवहारे, पूजा आव्हाड, अंकित जाधव, गीता पाटील, छाया चव्हाण, वैशाली ढोले आदी उपस्थित होते. या शिबिरात जम्मापट्टी धसवाडी, धनगरवाडी, धनगर पट्टा आणि माणगाव वाडीमधील ग्रामस्थ अशा १५६ रुग्ण यांची तपासणी करण्यात आली.

नागोठणे परिसर मोतीबिंदू मुक्त करणार

। नागोठणे । वार्ताहर ।

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे मॅन्युफॅक्चरींग डीव्हिजन, सी. एस. आर. विभाग व लायन्स हेल्थ फाउंडेशन, चोंढी-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २३ रोजी सकाळी १० ते दुपारी दोन या दरम्यान नागोठणे परिसरातील ग्रामपंचायत कुहिरे व ग्रामपंचायत वरवठणे हद्दीतील वय वर्षे ४५ च्या पुढील नागरीकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते नागोठणे जवळील वरवठणे येथील आयोजित नेत्र तपासणी शिबिरात धनावडे बोलत होते.

प्रज्ञा जवके, उदय जवके, राजन जगताप, ऋतुजा म्हात्रे, गणपत म्हात्रे,श्रीकांत गोडबोले यांच्या हस्ते शिबिरास प्रारंभ झाला. यावेळी रिलायन्सचे जनसंपर्क अधिकारी रमेश धनावडे, सी एस आर विभागाच्या प्रमुख वरदा कुळकर्णी, शुभदा कुडतलकर, डॉ. प्रशांत बारडोलइ, किरण सातवे, दयानंद ठाकूर, प्रमोद कदम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात एकूण ७१ नागरिकांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी एकूण २६ मोतीबिंदू रुग्ण आढळले.

बूस्टर डोसची मागणी

पनवेल : कोरोना विषाणूने पुन्हा एकदा डोके वर काढायला सुरुवात केली आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने नुकतेच हा आजार भारतात वाढण्याची शक्यता दर्शवलेली असून लोकांना प्रतिबंधात्मक उपाय करण्याचे एका पत्रकाद्वारे जाहीर केलेले आहे.

या पार्श्वभूमीवर रामदास शेवाळे यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांची शनिवारी भेट घेतली. यावेळी बूस्टर डोस लसीकरण मोहीम पुन्हा सुरु करण्याची मागणी केली. त्यानुसार आयुक्तांनी प्रत्येक आरोग्य केंद्रात, लसीकरण येत्या तीन ते चार दिवसात सुरु करण्याची ग्वाही दिली. यावेळी मंगेश रानवडे, इम्तिज शेख, मुनाफ आमिरली, झोहेब शेख आदी उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ अलिबागमध्ये ड्रायव्हर व सेल्समन पाहिजेत. अलिबागजवळील व्यक्तीस प्राधान्य. Mob No. 7447480000

■ कंपनीमध्ये कामासाठी मुली आणि मुले पाहिजेत. प्रशिक्षण दिले जाईल. शिक्षणाची अट नाही. पगार ७५००, प्रति महिना, एक वर्षानंतर परमनंट केले जाईल. ठिकाण= बामणसुरे- चोंढी, मो.नं.= ९८२३५८५३२१

■ वर पाहिजे- वधु-वय ३०, उंची ५.४ शिक्षण-B.Com MBA जात-आगरी. ९४२२६८९६७४.

■ चोंढी अलिबागमध्ये ब्युटी पार्लर कामासाठी मुले-मुली पाहिजेत. मो.९९२१०७३९६३

■ खात्रीने इंग्लीश बोलायला शिकवणारा विश्वसनीय शार्टकोर्स ९८२२८४२८१०

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

वाकण-पाली-खोपोली मार्गावर सुसाट प्रवास

रुंदीकरणाचे काम ९६ टक्के पूर्ण

। सुधागड -पाली । वार्ताहर ।

वाकण - पाली - खोपोली राज्य महामार्गाचे रुंदीकरण व काँक्रिटीकरणाचे काम जवळपास ९६ टक्के पूर्ण झाले आहे. याबरोबरच मुंबई-गोवा महामार्गाच्या दुरवस्थेमुळे अनेकजण या मार्गाला पसंती देत आहेत. मुंबई-पुणे दक्षिण रायगड व कोकणाकडे जाण्यासाठी हा मार्ग सोयीचा ठरत आहे.

हा मार्ग तयार करण्यासाठी आत्तापर्यंत दोन मुख्य ठेकेदार व अनेक उपठेकेदार बदलण्यात आले आहेत. शिवाय स्थानिक शेतकऱ्यांचा विविध मागण्यांसाठी विरोध, प्रदीर्घ वेळ, कोरोना काळात काम बंद अशा अनेक अडचणींचा सामना हा मार्ग बनवितांना करावा लागला आहे. मात्र सद्यस्थितीत रस्त्याचे काम ९६.५ टक्के पूर्ण झाले आहे. काही पुलांचे काम बाकी आहे. मात्र मुंबई-गोवा महामार्गापेक्षा हा मार्ग सुस्थितीत असल्याने अनेकांच्या पसंतीचा ठरत आहे. या मार्गावरून सतत वाहनांची रेलचेल व गर्दी पाहायला मिळत आहे. यामुळे पर्यटन व रोजगार आणि उद्योगधंदे वाढीला चालना देखील मिळत आहे.

कोकणाकडे जाण्यासाठी वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. हा मार्ग मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय मानला जातो. तसेच मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग व मुंबई-गोवा महामार्गाला जोडतो. त्याच बरोबर येथून विळे मार्गे पुणे आणि माणगावला ही जाता येते. त्यामुळे मुंबई पुणे तसेच कोकणासाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे.

वाकण-पाली-खोपोली हा राज्यमार्ग क्र. ५४८ (अ) एकूण ३९ किलोमीटर लांबीचा आहे. रस्त्याची रूंदी ३० मीटर असून यामध्ये काँक्रिटीकरण, साईटपट्टी, गटार रस्त्याच्या दुतर्फा झाडे, फलक, रिफ्लेक्टर अशा प्रकारच्या बाबींचा समावेश आहे. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून रुंदीकरणाचे काम सन २०१६ पासून हाती घेण्यात आले. यासाठी शासनाकडून सुमारे १९८ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

पुलांचे काम प्रगतीपथावर

या मार्गावर पाली, जांभूळपाडा व भालगुल येथे नदीवर पुलाचे काम होत आहे. जांभूळपाडा येथील एका पुलाची बाजू पूर्ण झाली आहे. दुसराही पूल पूर्ण झाला असून काही दिवसांत वाहतुकीसाठी खुला होईल. भालगुल येथील एका बाजूच्या नव्या पुलाचे काम पूर्ण झाले आहे. शेजारच्या दुसऱ्या पुलाचे काम लवकरच सुरू होईल. पाली येथील अंबा नदीवरील एका पुलाचे काम पूर्ण झाले आहे. येथील जोड रस्त्याचे काम मार्गी लागले तर जुना पूल पूर्णपणे पाडणार आहोत. आणि येथे नवीन पुलाचे काम सुरू करू शकतो. असे एमएसआरडीसी उपअभियंता सचिन निफाडे यांनी सांगितले. मिरकूटवाडी येथील पुलाचे व रस्त्याच्या काही भागाचे काम अजून बाकी आहे. मात्र हे काम आगामी पंधरा दिवसांमध्ये सुरू होईल असे देखील निफाडे यांनी सांगितले.

भक्कम, रुंद व उंच पूल

या तीन पुलाच्या बांधकामाला २५ कोटी चा निधी मिळाला आहे. पाली अंबा पुलाची उंची १६ मीटर आहे. तर लांबी ११० मीटर तसेच जांभूळपाडा पूल उंची १६ मीटर, लांबी ७० मीटर, भालगूल पूल उंची १६ मीटर, लांबी ५५ मीटर आहे, हे तिन्ही पूल चार लेनचे आहेत. यांची भार पेलण्याची क्षमता तब्बल ७५ टन म्हणजे जुन्या पुलापेक्षा साडेतीन पट अधिक आहे.

> नियमित या मार्गावरून प्रवास करतो. उशिरा का होईना पण मार्ग बहुतांश पूर्ण झाला आहे. मात्र दर्जा राखणे अपेक्षित होते. पुलांचे उर्वरित काम लवकर होणे आवश्यक आहे. तरी सद्यस्थितीत येथील प्रवास सुखकर झाला आहे. अनेकजण या मार्गाचा वापर करतात.
>
> –अमित निंबाळकर, प्रहार जनशक्ती पक्ष तालुका अध्यक्ष

> आजघडीला रस्त्याचे काम ९६.५ टक्के पूर्ण झाले आहे. कामाला सुरुवात केल्यापासून बऱ्याच अडचणींना सामोरे जावं लागले. परंतु या सर्वातून सातत्याने मार्ग काढत आज रस्ता वाहतुकीस सुरळीत केला आहे. काम सुरू केल्यानंतर सुरुवातीच्या दोन वर्षाच्या काळात काही ठराविक लोकांच्या चुकीच्या आग्रहामुळे व चुकीच्या निर्देशामुळे ठरवून दिलेल्या कामात खूप बदल करावे लागले. रस्ता निर्मितीसाठी ठिकठिकाणच्या स्थानिक प्रशासनाचे चांगले सहकार्य लाभले.
>
> – सचिन निफाडे, उपअभियंता, एमएसआरडीसी

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

वाजेकर स्कूलचे वार्षिक पारितोषिक स्नेहसंमेलन

। पनवेल । वार्ताहर ।

कोएसो इंदुबाई वाजेकर इंग्रजी माध्यम शाळेचे पारितोषिक वितरण समारंभ आणि वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळा समितीचे चेअरमन व्ही.सी. म्हात्रे यांनी भूषविले. तर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाळा समितीच्या सदस्या अंजली उर्हेकर तसेच इंडियन आयडल मराठीचा विजेता सागर म्हात्रे होते. यावेळी शाळा समितीचे सदस्य सुभाष देशपांडे, नंदकुमार वाजेकर, शाळेचे माजी सभापती ॲड. प्रमोद ठाकूर, रोटरी क्लबचे सदस्य, विद्या संकुलातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ या वर्षातील दहावीतील गुणवंत विद्यार्थी आणि पालकांचा सत्कार करण्यात आला. तसेच स्कॉलरशिप परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी, पालक यांचा सत्कार करण्यात आला. शाळेच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेतील सांघिक बक्षिसांचे वितरण करण्यात आले. शाळेचे हस्तलिखित ब्लॉसममचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनीषा पाटील यांनी केले. तर शाळेच्या वार्षिक अहवालाचे वाचन मानसी कोकीळ यांनी केले. सायंकाळी शाळेच्या प्रांगणात नर्सरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन साजरे झाले. यामध्ये विद्यार्थ्यांनी चांगल्या सवयी या विषयावर नाटिका, छत्रपती शिवाजी महाराज, अवयव दान, मोबाईलचे इफेक्ट, कोरोना योद्धांना मानवंदना, महाराष्ट्राची लोकधारा, विविधतेत एकता, भारतातील विविध सण समारंभ अशा वैविध्यपूर्ण विषयांवर नृत्य सादर केले.

गजानन म्हात्रे यांना पदोन्नती

। खोपोली । प्रतिनिधी।

मुंबई- पुणे दुतगती महामार्गावरील बोरघाटात वाहतूक नियंत्रण शाखेत एएसआय पदावर कार्यरत असणारे गजानन म्हात्रे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी झाल्याने म्हात्रे यांचे जिल्हा वाहतूक नियंत्रण पोलीस अधिक्षक यांनी मुख्यालयात सत्कार केला. यावेळी डिवायएसपी भागडिलकर, पोलीस निरीक्षक मोरे व अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पोलीस दलात गेली ३४ वर्षांपासून सेवेत रुजू झाल्यापासून अगदी निष्ठेने आपली जबाबदारी समर्थपणे संभाळून वरिष्ठांचा मान राखत आदेशानुसार काम करणे हा त्याचा स्वभाव असल्याने म्हात्रे यांचे सर्वांशी अगदी सलोख्याचे सबंध आहेत.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

महत्त्वाचे

शाळेला यश

महाड : तालुक्यातील वहूर येथे आयडियल फाउंडेशन मुंबईच्या कोकण टॅलेंट फोरमतर्फे घेण्यात आलेल्या रायगड जिल्हास्तरीय शैक्षणिक स्पर्धेत रोह्यातील अंजुमन इस्लाम जंजिरा उर्दू शाळेने घवघवीत यश मिळविले. या स्पर्धेत जिल्ह्यातील २५ शाळांनी भाग घेतला होता. बुद्धिमत्ता चाचणी स्पर्धेत अनम जव्वाद पेडेकर, शब्द बनविणे स्पर्धेत उस्मान तौकिर नोरे, मराठी निबंध स्पर्धेत आयशा हजरत अली खान, उर्दू वक्तृत स्पर्धेत सलवा मोहसीन दाखवे या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. सर्व विद्यार्थ्यांचे रियाज शेटे, अ. कादिर रोगे, अतिक बडे, सलीम चौगले व सर्फराज बंदरकर, डॉ. फरिद चिमावकर आदींनी अभिनंदन केले.

सुप्त गुण ओळखून आयुष्य घडवा

चिरनेर : सुप्त गुणांना ओळखून आयुष्य घडवा, आयुष्यात अनेक संध्या चालून येत असतात त्याचे सोने करा असे आवाहनपर कोकण मराठी साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ यांनी पनवेल येथे मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनाच्या वेळी केले. यावेळी प्रा एल. बी. पाटील, गणेश कोळी, प्रा. चंद्रकांत मढवी, जोशना राजपूत, स्मिता गांधी, गणेश म्हात्रे, रामदास गायधने, विकास पुंडले, जनार्दन सताने, संगीता थोरात, सुनिता खिल्लारे आदी जण उपस्थित होते.

जिल्ह्यातील २६ शाळांचा स्वदेसतर्फे सन्मान

। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।

रायगड जिल्हा परिषद व स्वदेस फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषदेच्या ना.ना. पाटील सभागृहात सक्षम शाळा पुरस्कार वितरण समारंभ शुक्रवारी संपन्न झाला. या वेळी प्राथमिक व माध्यमिक २६ शाळांचा सन्मान करण्यात आला. शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, शाळेचा परिसर स्वच्छ पर्यावरण पूरक करणे, विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचे ज्ञान देणे यासह इतर शैक्षणिक उपक्रमांचा सहभाग आहे. या उपक्रमांना स्वदेस फाऊंडेशनचे सहकार्य लाभले. उपक्रमाअंतर्गत जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक १२६ शाळांनी सहभाग नोंदविला होता. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, स्वदेश फाऊंडेशन संचालक झरीना स्क्रूवाला, मंगेश वांगे, प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांच्यासह जिल्हा परिषद शिक्षण विभागातील अधिकारी, स्वदेश फाऊंडेशन सदस्य, मुख्याध्यापक उपस्थित होते.

माध्यमिक विभागात तळा तालुक्यातील अभिनव ज्ञानमंदिर, उसर शाळेने प्रथम क्रमांक मिळविला. या शाळेला पाच लाख रुपये रक्कम, चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तर माणगाव तालुक्यातील टाटा विद्यालय, भिरा शाळेने द्वितीय क्रमांक मिळविला. या शाळेला तीन लाख रुपये, चषक, सन्मानचिन्ह, तर तृतीय क्रमांक मिळविल्याबद्दल तळा तालुक्यातील एस.एस. निकम इंग्लिश मीडियम स्कूल शाळेला दोन लाख रुपये, चषक, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. प्राथमिक विभागात रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांचा गौरव करण्यात आला. माणगाव तालुक्यातील रानवडे शाळेने प्रथम क्रमांक मिळविला. शाळेला तीन लाख रुपये रक्कम चषक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तर माणगाव तालुक्यातील भाले शाळेने द्वितीय क्रमांक मिळविला. या शाळेला दोन लाख रुपये, चषक, सन्मानचिन्ह, तर तृतीय क्रमांक मिळविल्याबद्दल पोलादपूर तालुक्यातील सडवली व महाड तालुक्यातील सुतारकोंड या शाळांना एक लाख रुपये, चषक, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तर उत्तेजनार्थ जिल्हा परिषदेच्या पाच शाळांना ५० हजार रुपये चषक, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तर उर्वरित १४ शाळांना चषक, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

शाळेला प.पू.गगनगिरी महाराजांचे नाव

। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापूर तालुका शिक्षण मंडळाच्या अधिपत्याखालील सीबीएसई शाळा चार वर्षापूर्वी सुरू केली आहे.या शाळेला प.पू.गगनगिरी महाराजांचे नाव देण्याचे भाग्य आम्हाला मिळाले असल्याची प्रतिक्रिया संस्थेचे कार्यवाहक किशोर पाटील यांनी वार्षिक स्नेहसंम्मेलनाच्या उद्घाटन प्रसंगी म्हणाले. याप्रसंगी केटीएस मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम,कार्यवाहक किशोर पाटील,जनता विद्यालयाचे अध्यक्ष दिनेश गुरव,केएमसी कॉलेजचे अध्यक्ष राजू अभाणी,राजू ठक्कर,अनंता हाडप, अबू जळगावकर, दिलीप पोरवाल, नरेंद्र शहा, चंद्रकांत केदारी,भास्कर लांडगे,प.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूलचे प्रिन्सीपल गौरव तिवारी,जनता विद्यालयाच्या सुनिता चव्हाण,समिक्षा ढोके आदि उपस्थित होते.

विवेक पाटील सन्मानित

। उरण । वार्ताहर ।

पागोटे गावचे जाणता राजा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विवेक चंद्रकांत पाटील यांना सामाजिक क्षेत्रात निःस्वार्थी कार्य केल्याबद्दल द्रोणागीरी भुषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत यांच्या हस्ते हा सन्मान देण्यात आला. त्यांनी जाणता राजा प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक विविध सामाजिक उपक्रम तसेच गोरगरिबांना मदत केली आहे. या पुरस्कारामुळे माझ्या सामाजिक कार्याची दखल घेण्यात आली असे विवेक पाटील यांनी सांगितले.

पनवेल फेस्टिवलची दिमाखदार सुरुवात

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेलमध्ये खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या समोर रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या वतीने रौपमहोत्सवी पनवेल फेस्टिवलची दिमाखदार सुरुवात झाली. हा महोत्सव २३ डिसेंबर ते १ जानेवारीपर्यंत चालू राहणार आहे. या महोत्सवाचे उद्घाटन आशिष गांगुली यांच्या हस्ते पार पडला.

सदर कार्यक्रमास डॉ. दीपक पुरोहित, शिरीष नांदेडकर, राजेंद्र मोरे, श्रीकृष्ण पाटील, किरण परमार, प्रसिद्धी प्रमुख लगाटे, तसेच रोटरी क्लब ऑफ पनवेलचे सर्व सभासद उपस्थित होते. यावेळी गांगुली यांनी रोटरी क्लब हे समाज बांधवांच्या उत्कर्षासाठी नेहमीच अग्रेसर काम करत आहे. या महोत्सव मधून मिळालेला पैसा गरीब आणि होतकरू मुलांच्या शिक्षणासाठी वापरला जाणार असल्याचे सांगितले. १८००० स्क्वेअर फुट जागेमध्ये २२० स्टॉल्स, ५० पेक्षा जास्त फूड स्टॉल आणि नागरिक, लहान मुलांसाठी फेअरचे आयोजन केले आहे. याचा लाभ परिसरातील नागरिकांनी घ्यावा असे आव्हान प्रोजेक्ट चेअरमन राजेंद्र मोरे यांनी केले आहे.

SECTION 1
PRESS NOTICE
NOTICE INVITING BIDS

The Superintending Engineer, PMGSY, Kokan Region, Thane on behalf of Government of Maharashtra invites theitem rate bids in electronic tendering system for Construction of Bridge under **Mukhya**Mantri Gram Sadak Yojanain the district of **RAIGAD, Alibag** for package number **ADB-RAI-BR-02** (span length **48.00 meter**) including their maintenance for five years from the eligible contractors registered with Govt. of Maharashtra, in Public Works Department/Rural Development Department or Non-registered contractors.

Date of release of Invitation for Bids through e-procurement **26th Dec. 2022.**

Availability of Bid Documents and mode of submission : The bid document is available online and should be submitted online in https://mahatenders.gov.in. The bidder would be required to register in the web site which is free of cost. For submission of the bids, the bidder is required to have a valid Digital Signature Certificate (DSC) from one of the authorized Certifying Authorities.

Last Date/Time for receipt of bids through e-procurement 02nd Jan. 2023 up to 17.00 hours.

For Further details please log on to https://mahatenders.gov.in

Sd/-
Superintending Engineer
PradhanMantri Gram Sadak Yojana
Konkan Region, Thane

'भांडवलदार धार्जिणे कायदे बदलांना विरोध करणार'

। उरण । प्रतिनिधी ।

राज्य सरकार सोमवारी नागपूर अधिवेशनात कामगार कायद्यात भांडवलदार व मालक धार्जिणे बदल करणारे विद्येयक मांडणार आहे. या सरकारच्या कामगार विरोधी धोरणांना सीआयटीयु ही केंद्रीय कामगार संघटना राज्य भर विरोध करणार असल्याची घोषणा सिटूचे महाराष्ट्र सचिव ॲड.एम. एच.शेख यांनी केली. उरणच्या जेएनपीटी कामगार वसाहतीच्या सभागृहात सीआयटीयुच्या रायगड जिल्हा अधिवेशनात ते बोलत होते.

नागपूर येथे विधानसभेचे अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनात केंद्र सरकार प्रमाणे राज्य सरकार ही कामगार कायद्यात बदल करणार आहे. या बदलात कामगाराना संरक्षण देणाऱ्या तरतुदी हटवून त्या ऐवजी भांडवलदार व मालकांच्या फायद्याचे बदल प्रस्तावित आहेत. या बदलात कामगार कायद्यात मालक आणि भांडवलदारासाठी असलेली शिक्षा आणि दंड यामध्ये कमी करून दिखाऊ तरतूद करण्यात येणार आहे. त्यामुळे कामगार कायदे कमजोर होणार आहेत. याचा परिणाम कामगारांचे भांडवलदार व मालकांच्या शोषणात होणार आहे. त्यामुळे या कायदा बदलांचा संपूर्ण राज्यात सीआयटीयुच्या वतीने विरोध करण्यात येणार आहे.

सीआयटीयुच्या रायगड जिल्हा अधिवेशनाची सुरुवात झेंडा वंदन आणि हुतात्म्यांना अभिवादन करून झाली. यावेळी सीआयटीयु चे रायगड जिल्हा सरचिटणीस व जेएनपीटीचे माजी विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील यांनी तीन वर्षांच्या कामाचा अहवाल मांडला, तर कामगार प्रतिनिधीनी चर्चा करून पुढील काळात कामगारांच्या प्रश्नांवर लढा व एकजूट करण्याचा निर्धार करण्यात आला.

अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी मधुसूदन म्हात्रे हे होते, तर यावेळी कॉम्रेड महाराष्ट्राचे कामगार नेते डॉ.एस.के.रेगे, कॉम्रेड के.आर. रघु यांच्यासह किसान सभेचे संजय ठाकूर, जनवादी महिला संघटनेच्या रायगड जिल्हा अध्यक्ष अमिता ठाकूर, डीवायएफआय चे सचिव राकेश म्हात्रे यांनी शुभेच्छा दिल्या. तर शशी यादव, कल्पना घरत, विद्या पाटील, हिरामण पाटील या कामगार प्रतिनिधींनी सूचना मांडल्या. या अधिवेशनात पुढील तीन वर्षांसाठी नवीन रायगड जिल्हा कमिटीचीही निवड करण्यात आली.

Sahyadri Green Valley
(Plot Owners) CHS LTD.
Village: Naldhe- Karjat- Raigad
Regd. No. RGD/KJT/HSG(TO)2549
DT. 2012-2013/2012

TENDER NOTICE

Name of Work: Construction of Internal Road- Tremix Concrete Road, Approx. 1.25 km.
Time Limit: **4 Months**

For Tender Documents call Society Admin Office on **Mobile No. 9833979809**. Tender Cost: Rs. 5000/- only by D.D payable at Mumbai or by RTGS Tender Documents Collection Time: 10.30. to 3.30 p.m. Date: From 26.12.2022 to 28.12.2022 Both Inclusive & 4th Jan. 2023 to 7th Jan. 2023 both Inclusive. Last Date Submission: 10th Jan. 2023 to 14th Jan. 2023 Both Inclusive. Submission Time: 10.30 a.m. 3.300 p.m. please bring your Rubber Stamp while purchasing the Tender Documents.

Sd/-
Chairman

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कार्ले, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १.श्रीमती. विमल मोतीराम भगत, २.श्री.महेश मोतीराम भगत,३.मनोहर मोतीराम भगत, ४.सुनिता सुदाम भगत, ५.भारती उर्फ संगिता भरत धसाडे, ६.अश्विनी अशोक धसाडे, सर्व रा.मु.धोलपाडा, पो.खंडाळे, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या सामाईक नांवे असलेली मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग क्र.	क्षेत्र(हे.आर.)	आकार (रु.पै.)
कार्ले	२४४	0-५०-00	१.१२
ता.अलिबाग		पो.ख.0-११-00	
जि.रायगड		एकूण क्षेत्र 0-६१-00	

वर नमूद भातशेती मिळकतीपैकी क्र.२ श्री.महेश मोतीराम भगत यांचा असलेल्या अविभक्त मालकी हिश्श्याचे 0-२0-00 हे.आर., इतकी मिळकत

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे गृहीत धरून वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख:२३/१२/२०२२ सही/-
श्री.किशोर वामन तेलंगे
पत्ता:श्री साई कल्सल्टंन्सी, दुयम निबंधक सो, कार्यालयासमोर गाळा क्र.३, अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.
मो.नं.९८२२३४८१७३,८८०५३२८६४६

बांगलादेशवर रोमांचक विजय

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या समीकरणात भारताला दुहेरी फायदा

। ढाका । वृत्तसंस्था ।

बांगलादेश विरुद्ध भारत यांच्यात मालिकेतील दुसरा कसोटी सामना खेळला गेला. या सामन्यात भारताने सामन्याच्या चौथ्या दिवशी म्हणजे रविवारी (२५ डिसेंबर) तीन विकेट्सने रोमांचक विजय मिळवला. ज्यामुळे भारताने दोन सामन्यांची कसोटी मालिका २-० अशी जिंकली आहे. भारताच्या दुसऱ्या डावात झटपट विकेट्स पडत असताना आर अश्विन, श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेल यांनी उल्लेखीय फलंदाजी केली. विजयासाठी मिळालेले १४५ धावांचे लक्ष्य भारताने ४७ षटकात ७ विकेट्स गमावत पूर्ण केले.

भारतीय क्रिकेट संघाने जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये आणखी एक मालिका जिंकली आहे. त्यामुळे पाकिस्तान संघाचे जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचण्याचे सर्व मार्ग बंद झाले आहेत. मात्र, भारतीय संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे, असे नाही. अंतिम फेरी गाठण्यासाठी भारतीय संघाला त्यांच्या भूमीवर चार सामन्यांच्या कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलियाचा सामना करायचा आहे.

जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा २०२३च्या अंतिम फेरीत पोहोचण्याच्या शर्यतीत आता फक्त चार संघ आहेत, ज्यात ऑस्ट्रेलिया, भारत, दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका यांचा समावेश आहे. त्याचबरोबर अंतिम शर्यतीतून बाहेर पडणारा पाकिस्तान हा पाचवा संघ ठरला आहे. पाकिस्तानपूर्वी इंग्लंड, न्यूझीलंड, वेस्ट इंडिज आणि बांगलादेश हे संघ याआधीच बाहेर पडले आहेत. याशिवाय, या विजयासह भारतीय संघाने विजयाची टक्केवारी वाढवली आहे.

जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या नवीन सायकलमध्ये टीम इंडियाची विजयाची टक्केवारी सध्या ५८.९३ टक्के आहे. गुणतालिकेत संघ दुसऱ्या स्थानावर आहे. भारतापेक्षा ऑस्ट्रेलिया हा एकमेव संघ आहे, ज्याने आतापर्यंत ७६.९२ टक्केने सामने जिंकले आहेत. तिसऱ्या क्रमांकावर दक्षिण आफ्रिकेचा संघ आहे, ज्याची विजयाची टक्केवारी ५४.५५टक्के आहे, तर श्रीलंका संघ ५३.३३ टक्केने सामना जिंकण्यात यशस्वी झाला आहे. इंग्लंडविरुद्ध झालेल्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत पाकिस्तानचा संघ क्लीन स्वीप स्विकारत असताना, अशी परिस्थिती निर्माण झाली होती की, भारतीय संघ बांगलादेशकडून दुसरा सामना हरला आणि त्यानंतर ऑस्ट्रेलियन संघाने भारताला मायभूमीत होणाऱ्या मालिकेत पराभूत केले, तर पाकिस्तान संघ सर्वोत्तम दोन मध्ये येऊ शकतो. परंतु आता ते घडणे शक्य नाही. मात्र, पाकिस्तानचा संघ पहिल्या चारमध्ये पोहोचू शकतो.

कळंबोलीत जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धा

। उरण। प्रतिनिधी ।

जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय अलिबाग व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने कळंबोली येथील सुधागड विद्यासंकुल मैदानात खो-खो स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन सुधागड विद्या संकुलाचे प्रा. राजेंद्र पालवे यांच्या हस्ते करण्यात आले. ही स्पर्धा १४,१७ व १९ वर्षे या वयोगटातील पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमधील मुले व मुलींसाठी आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत १४ वर्षे मुले प्रथम क्रमांक महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे ज्ञानमंदिर कळंबोली, द्वितीय महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी प्राथमिक विभाग कळंबोली. १७ वर्षे वयोगट मुले प्रथम क्रमांक महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी कळंबोली, द्वितीय आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके विद्यालय नवीन पनवेल यांनी मिळविला. १९ वर्षे वयोगट मुले प्रथम क्रमांक सु.ए.सोचे उच्च माध्यमिक विद्यालय कळंबोली, द्वितीय क्रमांक के.ए.ई. कळंबोली यांनी मिळविला.

१४ वर्षे वयोगट मुली प्रथम क्रमांक सु.ए.सोचे माध्यमिक विद्यालय कळंबोली, द्वितीय क्रमांक म.ए.सोचे ज्ञानमंदिर कळंबोली यांनी मिळविला. १७ वर्षे वयोगट मुली प्रथम क्रमांक म.ए. सोसायटीचे ज्ञानमंदिर कळंबोली, द्वितीय सु.ए.सोचे माध्यमिक विद्यालय कळंबोली, तर १९ वर्षे वयोगट मुली प्रथम क्रमांक के.आ. बांठीया विद्यालय नवीन पनवेल, द्वितीय क्रमांक सु.ए.सोचे उच्च माध्यमिक विद्यालय कळंबोली यांनी मिळविला.

या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सुधागड विद्या संकुलाचे प्रा. राजेंद्र पालवे, उपप्राचार्य कसबे, प्रा. संभाजी बडे, हर्षल पाटील, अधीक्षक दत्ता शिंदे, पर्यवेक्षक सुरेश शिंदे, विकास नाईक, एस.पी. पाटील आदी शिक्षकांनी मेहनत घेतली होती.

बजरंगी व्यायाम शाळेचे उद्घाटन

। मुरूड । प्रतिनिधी ।

मुरुड शहरात बाजारपेठेत बजरंगी व्यायाम शाळेचे उद्घाटन रायगड जिल्हा बॉडी बिल्डिंग अससोसिएशन संघटनेचे जिल्हा अध्यक्ष ॲड. किरण कोसंकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र गोल्ड विजेता आणि रायगड श्री विजेता संजय उले, माजी रायगड श्री व व्यायामशाळेचे संस्थापक आशिष खोत, अथर्व खोत, शैलेश खोत, जागन पुलेकर, चंदन खोत, दिपक पालशेतकर, मंदार मुंबईकर, प्रथमेश आंबूकर, ओम मयेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

शहरातच नव्हे तर तालुक्यातील तरुणांना आपल्या आरोग्याची कशी काळजी घ्यावी व आपले शरीर बलवान कसे करावे तसेच आपले आरोग्य निरोगी राहण्यासाठी कसा प्रयत्न करायचा या उद्देशाने बजरंगी व्यायामशाळेची स्थापना करण्यात आली असल्याचे खोत यांनी सांगितले.

राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राचे संघ जाहीर

। मुंबई । प्रतिनिधी ।

भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या मान्यतेने झारखंड राज्य कबड्डी असोशिएशच्या विद्यमाने दि. २७ ते ३० डिसें. या कालावधीत बोकारो स्टील सिटी येथे होणाऱ्या ३२व्या किशोर/किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राने आपले संघ आज जाहीर केले.

पुण्याचा श्रीधर कदमकडे किशोर, तर परभणीच्या समीक्षा तुरेकडे किशोरी गट संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली. नुकत्याच लातूर येथे १५ ते १८ डिसें. या कालावधीत झालेल्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतून हा संघ निवडण्यात आला. किशोर गटातील विजेता परभणी व उपविजेता हिंगोली यांच्या २-२ खेळाडूंनी या संघात स्थान मिळविले आहे. किशोरी गटात विजेत्या सांगलीचे दोन खेळाडू असून उपविजेत्या परभणीने संघाच्या नेतृत्वासह आणखी एका असे दोन खेळाडू या संघात आहेत.

या निवडण्यात आलेल्या संघाचे सराव शिबीर नाशिक येथे घेण्यात आले. नाशिक येथूनच हे संघ रांची एक्सप्रेसने स्पर्धेकरिता रवाना झाले. निवडण्यात आलेल्या या संघाची घोषणा राज्य कबड्डी असोशिएशचे सरचिटणीस आस्वाद पाटील यांनी प्रसार माध्यमाकरिता आज जाहीर केली. ती खालील प्रमाणे.

किशोर गट (मुले) :- १) श्रीधर कदम (संघनायक)-पुणे, २) ओम शिर्के-रत्नागिरी, ३) गणेश टेकाम - नाशिक, ४) दिघु दहातोंडे - हिंगोली, ५) लखन राठोड - हिंगोली, ६) सारंग रोकडे - परभणी, ७) मनीष ठेंगडे - नंदुरबार, ८) यश साळवे - अहमदनगर, ९)विजय तारे - परभणी, १०) सिद्धेश भोसले- मुंबई शहर, ११) संदेश बिल्ले- कोल्हापूर, १२) आदित्य भरडे - लातूर.

प्रशिक्षक :- ब्रम्हनाथ मेंगडे व्यवस्थापक :- दत्ता गायकवाड

किशोरी गट (मुली) :- १) समीक्षा तुरे (संघनायिका) - परभणी, २)अदिती काविलकर - मुंबई शहर, ३) श्रावणी भोसले - सांगली, ४) बिदिशा शेलार - नाशिक, ५) सायमा पठाण - सातारा, ६) सारा शिंदे - रत्नागिरी, ७) जागृती नांदविकर - मुंबई उपनगर, ८) प्रतीक्षा गुरव - कोल्हापूर, ९) प्राची चंदनकर - सोलापूर, १०) नेहा राठोड - परभणी, ११) श्रावणी सावंत - पुणे, १२) श्लोका पाणबुडे - सांगली.

प्रशिक्षक :- तुकाराम ताम्हणेकर व्यवस्थापिका :- मानसी वझट.

युवा क्रिकेटपटूंचे स्वप्न साकार होणार

पनवेलमध्ये ३३ व्या केंद्राचे उद्घाटन, देशात १०० प्रशिक्षण केंद्र

। पनवेल । वार्ताहर ।

माजी भारतीय क्रिकेटपटू इरफान पठाण आपल्या क्रिकेट अकादमींचा विस्तार वाढवत असल्याचे दिसत आहे. कारण त्याच्या क्रिकेट अकादमी ऑफ पठाणचे ३३वे केंद्र सुरु करण्यात आले आहे. अकादमी ऑफ पठाणचे ३३वे केंद्र हे पनवेल मधील कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी मध्ये सुरु केले आहे.

क्रिकेट अकादमी ऑफ पठाण अकादमी मध्ये तंत्रज्ञान, ऑन-ग्राउंड अभ्यासक्रम, आंतरराष्ट्रीय क्रिकेट तज्ञांनी डिझाइन केलेले मॉडेलद्वारे विद्यार्थ्यांना सर्वोत्तम क्रिकेटचे धडे शिकवण्यात येणार आहेत. याचा फायदा पनवेलसह अजूबाजूच्या परिसरातील मुलांना होणार आहे. या ठिकाणी भावी भारतीय खेळाडू घडवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

कॅम्प अकादमी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये वापरलेल्या तंत्रज्ञानाचा देखील वापर केला जाणार आहे. जसे की लाइव्ह फिडबॅक पद्धतीचा वापर करुन खेळाडूला येणाऱ्या समस्यांचे निराकरन केले जाणार आहे. त्याचबरोबर खेळाडू आणि कोच ते पाहून पटकन मैदानवरच त्या समस्येचे निराकरण करतील.

क्रिकेट अकादमी ऑफ पठाण संपूर्ण देशभरात १०० पेक्षा अधिक केंद्र सुरु करणार आहे. याबद्दल स्वत: इरफान पठाणने माहिती दिली. ज्यामुळे देशातील क्रिकेटपटूचे व्यावसायिक क्रिकेट खेळण्याचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होईल. त्यासाठी ही अकादमी सर्वोतोपरी मदत करणार असल्याची प्रतिक्रिया, माजी अस्टपैलू खेळाडू इरफान पठाण यांनी दिली. तो म्हणाला देशातील बऱ्याच भागात अकादमी सुरु केली आहे. तसेच येणाऱ्या काळात देशाबाहेर पठाण अकादमी पाहिला मिळेल.

बीसीसीआयच्या नव्या गाईडलाईन्स

। मुंबई । वृत्तसंस्था ।

श्रीलंकेचा क्रिकेट संघ वर्षाच्या सुरुवातीला भारताच्या दौर्यावर येणार आहे. जिथे दोघांमध्ये पहिल्या तीन सामन्यांची टी-२० आणि नंतर एकदिवशीय मालिका तितक्याच सामन्यांची खेळली जाणार आहे. ३ जानेवारीला टी-२० मालिकेतील पहिला सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. कोरोना विषाणूच्या नवीन संसर्गामुळे मुंबईत कोरोनाला रोखण्यासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत. काही देशांतून येणाऱ्या लोकांसाठी पुन्हा आरटी पीसीआर चाचणी आवश्यक करण्यात आली आहे.

भारत आणि श्रीलंका यांच्यातील पहिला टी २० सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळवण्यात येणार आहे. ज्यासाठी पेटीएम इनसाइडरवर तिकीट विक्री सुरू झाली आहे.

दरम्यान, यावेळी प्रेक्षक आणि खेळाडूंसाठी कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर काही नियम पुन्हा लागू होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर प्रेक्षकांची संख्येवर जरी मर्यादा नसल्या तरी मास्क घालणे अनिवार्य केले जाण्याची शक्यता आहे. तसेच, ज्येष्ठ व्यक्तींना आजारांनी ग्रस्त असलेल्या लोकांना प्रवेश नाकारण्यात येईल.

बीसीसीआय क्रिकेटपटूंसाठी जुने नियम देखील लागू करू शकते, जसे की प्रेक्षकांच्या जवळ न जाण्याचा सल्ला. खेळाडूंना त्यांच्यासोबत फोटो काढू नका आणि बाहेरील व्यक्तींना भेटू नका असे सांगितले जाऊ शकते. मुंबईत कोरोना विषाणूच्या नवीन प्रकाराबाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत. लोकांनी गर्दीच्या ठिकाणी गेल्यास मास्क लावा, सोशल डिस्टन्सिंगचे नियोजन करा, असे आवाहन बीएमसीने केले आहे.

वारंवार हात धुवा आणि स्वच्छतेची काळजी घ्या. जर एखाद्यामध्ये कोरोनाची लक्षणे असतील तर त्याने घराबाहेर पडू नये. वृद्धापकाळाने आणि इतर कोणत्याही आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांना अधिक काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

धामणसई कबड्डी स्पर्धेत कालभैरव गोकूळवाडा विजयी

। पाली/गोमाशी। वार्ताहर ।

शिवशक्ती मित्र मंडळ इंदरदेव धामणसई येथे रायगड जिल्हा धनगर समाज असोसिएशनच्या माध्यमातून भव्य कबड्डी स्पर्धाचे आयोजन शनिवार (२४) रोजी करण्यात आले होते.

या स्पर्धेत १६ संघाने सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेतील अंतिम लढत गोकूळवाडा अ आणि मिलगाव ब या दोन संघात झाली. या अटीतटीच्या लढतीत दोन्ही संघाच्या खेळाडूंनी आपला बहारदार खेळ केला.या स्पर्धेतील प्रथम क्रमांक गोकुळवाडा अ या संघास रोख रक्कम सात हजार व चषक, द्वितीय क्रमांक मिलगाव ब संघास रोख रक्कम पाच हजार व चषक,तृतीय क्रमांक सोनारशेत संघास रोख रक्कम तीन हजार व चषक,चतुर्थ क्रमाक गौळमाल अ संघास रोख रक्कम तीन हजार व चषक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेतील मालिकावीर महेश खरात (गोकुळवाडा) तर उत्कृष्ट चढाईदार दर्शन आखाडे (मिलगाव) उत्कृष्ट पक्कड आकाश ढेबे (गोकुळवाडा) या खेळाडूंना आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

एक धाव आरोग्यासाठी

। पेण । प्रतिनिधी ।

रोटरी क्लब ऑफ पेण आरोयन आणि ओव्हरियन फाऊंडेशन यांनी आयोजित एक धाव आरोग्यासाठी, एक धाव कॅन्सर मुक्तीसाठी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन पेण महात्मा गांधी मंदिर येथे करण्यात आली होती. या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये एकूण ३६३ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा दोन विभागात विभागण्यात आली होती. पुरुष गट आणि महिला गट एकूण सात किलोमीटरची स्पर्धा होती. महत्वाची बाब म्हणजे या स्पर्धेत पेण मधील आई डे केअरच्या गतीमंद व मतीमंद मुलांनी देखील सहभाग घेतला होता. ही स्पर्धा ओव्हरियन कॅन्सर या आजाराच्या जनजागृतीसाठी घेण्यात आली होती.

या स्पर्धेत पुरुष गटात लक्ष्मण दरोडा प्रथम क्रमांक (२१ मिनिटे), हरीराम मोरया व्दितीय क्रमांक (२२ मिनिटे) राज देवानंद पाटील तृतीय क्रमांक (२४ मिनिटे) तर महिला गटामध्ये ऋतुजा सकपाळ प्रथम क्रमांक (२० मिनिटे) दर्शना पाटील द्वितीय (२३ मिनिटे) मनाली गुंजावळे तृतीय क्रमांक (२६ मिनिटे) यांना सन्मानचिन्ह व रोख रक्कम देउन सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेची सुरुवात नगराध्यक्षा प्रितम पाटील, अण्णा वनगे, डॉ. सोनाली वनगे यांच्या हस्ते स्पर्धकांना झेंडा दाखवून करण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कृपा जोशी, डॉ. मनीष वनगे, डॉ. संदीप चौधरी, डॉ. सोनाली शेटये, पराग कणेकर, पर्णल कणेकर, संतोष पाटील, सुबोध जोशी, दर्शन म्हात्रे, अभिराज कणेकर यांच्यासह अनेक वैद्यकीय मंडळींनी मदत केली.

कृषीवलशी बोलताना डॉ. वनगे यांनी सांगितले की, ही मॅरेथॉन स्पर्धा बीजकोषातील कर्करोग याबाबत जनसामान्यांना माहिती मिळावी या आजाराबाबत जनजागृती व्हावी म्हणून घेण्यात आली. हा आजार नेहमी उशीरा समजतो पहिल्यांदा या आजारामध्ये त्रास काहीच होत नाही. त्यामुळे त्याची नियमीत तपासणी करणे गरजेचे असते. जेव्हा आपल्याला समजते तेव्हा खूप उशीर झालेला असतो. त्यामुळे या आजारात मृत्यू होण्याचे प्रमाण जास्त असते. आणि ज्यावेळी हा आजारा समजतो त्यावेळेला त्या व्यक्तीचे वाचण्याचे प्रमाण खूप कमी असते. म्हणून स्त्रियांनी नियमीत तपासणी करणे गरजेचे आहे.

जेणेकरुन त्या आजाराचे निदान लवकरात लवकर होईल आणि रुग्ण वाचण्याची शक्यता जास्त राहील म्हणून जनजागृतीचा उद्देश ठेवून आज या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, असे त्यांनी सांगितले.

ख्रिसमस निमित्त युक्रेनच्या राष्ट्रपतींचा विशेष संदेश

वर्षा मेहता
। अलिबाग ।



ख्रिसमस संदेशात झेलेन्स्की यांनी नमूद केले की युक्रेनियन सैन्य पूर्वेकडील डोनबास प्रदेशात लढाई लढत होते. युक्रेनियन या ख्रिसमसमध्ये लाखो लोकांना अंधारात बुडवलेल्या रशियन हल्ल्यांना न जुमानता ते नमन असल्याचे दाखवून स्वतःचा चमत्कार घडवतील, असे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी शनिवारी एका निंदनीय संदेशात सांगितले. रशियनने युद्ध सुरू केल्यापासून १० महिन्यांपासून बोलतांना, ज्यामध्ये हजारो लोक मारले गेले आणि लाखो अधिक विस्थापित झाले, झेलेन्स्की म्हणाले की स्वातंत्र्य उच्च किंमतीवर आले असले तरी गुलामगिरीची किंमत आणखी जास्त असेल. युद्धाच्या सुरुवातीला आम्ही सहन केले. आम्ही हल्ले, धमक्या, आण्विक ब्लॅकमेल, दहशतवाद, क्षेपणास्त्र हल्ल्यांचा सामना केला. आम्ही या हिवाळ्यात सहन करू कारण आम्हाला माहित आहे की आम्ही कशासाठी लढत आहोत, तो म्हणाला. ऑक्टोबरपासून अथक रशियन क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांमुळे वीज-निर्मिती यंत्रणेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, ज्यामुळे प्रमुख शहरे नियमितपणे पाणी आणि उष्णताशिवाय राहतात. झेलेन्स्की यांनी डिसेंबरमध्ये ख्रिसमस साजरे करणाऱ्या युक्रेनियन लोकांना व्हिडिओ संबोधित करताना त्यांची टिप्पणी केली. बहुतेक युक्रेनियन ऑर्थोडॉक्स ख्रिश्चन आहेत आणि जानेवारीच्या सुरुवातीस हा प्रसंग चिन्हांकित करतात. संपूर्ण अंधारातही, आम्ही एकमेकांना घट्ट मिठी मारण्यासाठी एकमेकांना शोधू. आणि जर उष्णता नसेल तर, आम्ही एकमेकांना उबदार करण्यासाठी बराच वेळ एकमेकांना मिठी मारू, असे ते म्हणाले.

SOCIAL MEDIA पडसाद

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)